राष्ट्रहिताय संस्कृतम्

कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

रामटेकम्

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरु द्वारा B++ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल

२०१८-१९

प.पू. श्रीगोळवलकरगुरूजी लोकार्पण समारोह – दि. 5.2.2019

प.पू. श्री. गोळवलकरगुरूजी गुरूकुलम् लोकार्पण समारोह प्रसंगी उपस्थित मा. पूर्वकुलगुरू डॉ. पंकज चांदे, सन्माननीय राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव. प. पू. श्री. विश्वेशतीर्थस्वामीजी, उडुपी, रा.स्व. संघाचे सरकार्यवाह श्री. भैयाजी जोशी, मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी, मा. आमदार श्री. गिरीशजी व्यास

संस्कृत पंचमहाकाव्ये लघुपट प्रकाशन समारोह

संस्कृत पंचमहाकाव्यावरील पाच लघुपटांचे प्रकाशन करतांना सन्मानीय प्रकाशजी जावळेकर, मानव संसाधन विकास मंत्री, नवी दिल्ली. (डावीकडून) श्री. किरणकुमार, विशेष कार्यकारी अधिकारी, ओएनजीसी(सीएसआर), प्रो. एस. आर. भट, अध्यक्ष आयसीपीआर, नवी दिल्ली. प्रो. विजयकुमार, अधिष्ठाता, वेदविद्या संकाय आणि समन्वयक, लघुपट प्रकल्प, प्रो. श्रीनिवास वरखेडी, मा. कुलगुरू, ककासंवि, रामटेक, प्रो. डी. पी. सिंग, अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग, प्रो. उमा वैद्य, पूर्वकुलगुरू, ककासंवि आणि सदस्य युजीसी, प्रो. श्रेयांश द्विवेदी, कुलगुरू, हरयाणा संस्कृत विद्यापीठ, प्रो. परमेश्वर नारायण शास्त्री, मा. कुलगुरू, राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली.

Hon'ble Shri. C. Vidyasagar Rao

Governor of Maharashtra

and

Chancellor of Universities in Maharashtra

Hon'ble Shri. Bhagat Singh Koshyari

Governor of Maharashtra

and

Chancellor of Universities in Maharashtra

संदेश

सत्र 2018–19चा विश्वविद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे. विश्वविद्यालयाची शैक्षणिक, संशोधन, पायाभूत सुविधा आणि अन्य प्रशासकीय स्तरांवर झालेली प्रगती आणि विकासाकडे होत असलेली दमदार वाटचाल याचा आढावा या अहवालाद्वारे घेण्यात आला आहे. या अहवालातील काही मुद्दे अधोरेखांकित करून नोंदवणे मला महत्त्वाचे वाटते.

- महाराष्ट्र शासनाद्वारे नागपूर जवळ वारंगा येथे विश्वविद्यालयाला 50 एकर जागा प्राप्त झाली असून त्याचे भूमिपूजन संपन्न झाले.
- रामटेक येथील शैक्षणिक भवन आणि वसतिगृहाचे कार्य पूर्ण होवून ती विश्वविद्यालयाने ताब्यात घेतली आहे. तसेच दीक्षांत सभागृहाचे बांधकाम प्रगती पथावर आहे.
- रामटेक आणि आसपासच्या परिसरातील युवाविद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळावे आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळावी यासाठी स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली. तसेच नेट / सेट मार्गदर्शन केंद्रही सुरू करण्यात आले.
- विश्वविद्यालयाच्या परीक्षा विभागाचे नागपूरहून रामटेक येथील मुख्यालयात स्थानांतरण करण्यात आले. परीक्षासंबंधित सर्व महत्त्वाचे आणि गोपनीय सर्व कार्य रामटेक येथून सुरू झाले आहे.
- वेदपाठशाळांना विश्वविद्यालयाचे संलग्नीकरण देऊन तेथे शिकणा–या विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयाद्वारे पदविका/पदवी प्रमाणपत्रे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन विश्वविद्यालयाने प्राचीन ज्ञान परंपरेचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य केले आहे.
- प्राचीन ज्ञान शाखांचा अर्वाचीन विज्ञान व तंत्रज्ञान आणि विषयांशी समन्वय करून त्याद्वारे विश्वविद्यालयीन छात्रांना नवनवीन अध्ययन व संशोधन संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून विश्वविद्यालयाद्वारे कर्नाटक संस्कृत विद्यापीठ आणि एमआयटी स्कूल ऑफ वैदिक स्टडीज्, पुणे यांच्याशीसामंजस्य कराराद्वारे विविध संशोधन विषयक कार्यक्रम राबविले जात आहेत.
- विश्वविद्यालयातर्फे संशोधक छात्रांना संशोधनवृत्ती देण्यात येणार आहे.
- विश्वविद्यालयाच्या दोन संशोधन प्रकल्पांना राष्ट्रीय संस्कृत संस्थानद्वारे मान्यता देखील प्राप्त झाली आहे.
- महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत संस्कृत शिक्षण आणि विश्वविद्यालयाचे कार्य प्रसृत व्हावे यासाठी विस्तार सेवा मंडळाचे पुनर्गठन करून सरल मानक संस्कृत कार्यशाळांचे आयोजन करून महाराष्ट्रातील संस्कृत प्रेमींचे आणि संस्कृत कार्यकर्त्यांना सम्मीलित करण्याचे कार्य सुरू झाले आहे.
- विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळी वरील सुयश हे विश्वविद्यालयासाठी भूषणावह आहे.

अशाप्रकारे विश्वविद्यालयाची शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधन, प्रशासन अशा विविध टप्प्यांवरील विकासाचा आलेख या अहवालात विशद करण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय सहकारी यांच्या एकत्रित प्रयत्नातून विश्वविद्यालय निरंतर प्रगती पथावर जाईल हा विश्वास मला वाटतो.

प्रो. श्रीनिवास वरखेडी

कुलगुरू

राष्ट्रहिताय संस्कृतम्

Mission

Sanskrit for all

Vision

Sanskrit for future

Research focus

Tradition for Innovation

प्रतिज्ञा

भारतः मम देशः । सर्वे भारतीयाः मम बान्धवाः । भारत देशे अहं स्निह्यामि । अस्य देशस्य याः समृद्धाः विविधाश्च परंपराः ताः प्रति मम शिरः अभिमानेन उन्नतं भवति । तासां परम्पराणाम् अनुगमनं कर्तुम् ताः आसादयितुं च अहं सदा प्रयतिष्ये ।

अहं पितरौ गुरुन् वयोज्येष्ठान् प्रति च आदरेण वर्तेय । सर्वान् प्रति सौजन्येन व्यवहरेयम् । अहं मम राष्ट्रेण देशबान्धवैश्च सह एकान्तनिष्ठम् आचरणं करोमि इति प्रतिजाने । तेषां कल्याणे समुत्कर्षे च मम आत्यन्तिकं सौख्यं विनिहितम् अस्ति ।

जयतु संस्कृतम् । जयतु भारतम् ।

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरू द्वारा

B++ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल

2018 –19

(अहवाल कालावधी – दि. 1 मे 2018 ते 30 एप्रिल 2019)

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email :registrar@kksu.org

कविकुलगुरू–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT
(2018-2019)

Committee

Prof. Kavita Holey	-	Chairperson
Dr. Harekrishna Agasti	-	Member
Dr. Ashish J.	-	Member
Ms. Shrivarda Malge	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member & Secretary

Published by
Registrar
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Copyright ©

Coverpage - Paper 300 gsm

Paper - Maplitho 80 gsm / Art Paper 130 gsm

Size - A4

Printed at :
M/s. Avadhoot Graphics & Printing, Nagpur.

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mouda Rd., Ramtek 441 106, Dist. Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No. : (07114) 2560992 Fax : (07114) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email :registrar@kksu.org

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक	
	मराठी	इंग्रजी
• **मा. कुलगुरूंचे मनोगत**		
• **विश्वविद्यालयाविषयी.....**	06	06
• **व्यवस्थापन परिषद् सदस्यांची यादी**		08
• **विद्वत्परिषद् सदस्यांची यादी**		09
• **विद्यापीठ नियोजन विकास मंडळ सदस्य**		11
• **परीक्षा मंडळ सदस्य**		12
• **विभागनिहाय अहवाल**		
○ वेद तथा व्याकरण विभाग	13	101
○ संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	21	110
○ भारतीय दर्शन विभाग	34	123
○ वेदांग ज्योतिष विभाग	43	135
○ शिक्षणशास्त्र विभाग	49	141
• **विस्तार सेवा अहवाल**		
○ राष्ट्रीय सेवा योजना	51	143
○ हस्तलिखित केंद्र	52	144
○ छात्र कल्याण	53	145
○ क्रीडा विभाग	58	157
○ महीला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती	59	158
○ सन्निधी माजी विद्यार्थी संघटना	61	
○ मराठी भाषा गौरव दिन	62	
○ महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार	64	

- **प्रशासकीय अहवाल**
  - सामान्य प्रशासन विभाग 67 159
  - आस्थापना विभाग 68 160
  - विद्या विभाग 69 161
  - महाविद्यालय विभाग 73 165
  - वित्त विभाग 75 167
  - अभियांत्रिकी विभाग 76 168
  - परीक्षा विभाग 82 173
  - ग्रंथालय व प्रकाशन विभाग 83 174
  - जनसंपर्क कक्ष 99 191

- **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी** 192

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणा–या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 15 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक(महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी(केरळ)
- लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा(बिहार)
- राष्ट्रिय संस्कृत संस्थान विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंद आचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, गुजरात
- महर्षी पाणिनी संस्कृत विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी महाराष्ट्रात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या सततच्या आग्रहाने व प्रेरणेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्री. सुधाकरराव नाईक यांनी ज्ञानयोगी स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांची एक सदस्यीय समिती गठित करून संस्कृत विश्वविद्यालयाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. जिचकार यांनी भारतातील सर्व विश्वविद्यालयांचे अध्ययन करून शासनाला एक विस्तृत अहवाल सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने व इतर शिक्षणशास्त्रतज्ज्ञांच्या अभ्यासाधारे महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला महाराष्ट्र व गोवा येथील शैक्षणिक संस्थांना संलग्नीकरण देण्याचा अधिकार आहे.

The former Prime Minister of India, Hon'ble Shri P.V. Narasimha Rao is a great scholor of Sanskrit, always insisted that Maharashtra has a great tradition of Sanskrit learning hence it should have an independent University. With his encouragement late Chief Minister of Maharashtra Hon'ble Shri Sudhakarraoji Naik took up the issue and appointed Dr. Shrikant Jichkar as one man committee to give a study report for establishing the Sanskrit University in Maharashtra. Dr. Jichkar prepared the study report and non-Formal University Act for the establishment of Sanskrit University in Maharashtra.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within Maharashtra & Goa.

संकाय

Sankayas (Faculties)

वेदविद्या

Faculty of Vedavidya

संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा

Faculty of Sanskrit & other languages

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती

Faculty of Indian Religion, Philosophy & Culture

प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे

Faculty of Ancient Indian Science & Humanities

शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा

Faculty of Education & Miscellaneous Faculties

शैक्षणिक विभाग

Teaching Departments

वेद तथा व्याकरण	Dept. of Veda & Vyakarana
संस्कृत भाषा तथा साहित्य	Dept. of Sanskrit Language & Literature
दर्शनशास्त्र	Dept. of Darshanshastra
वेदांग ज्योतिष	Dept. of Vedanga Jyotisha
शिक्षणशास्त्र	Dept. of Education

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Management Council

Section	Details	Name of the Person	Position
25 (2) i	Kulaguru–Adhyaksha	**Prof.ShrinivasaVarakhedi** Vice-Chancellor	Chairman
25 (2) ii	Sama-Kulaguru-Sadasya	Vacant	Member
25 (2) iii	One Adhishthata as prescribed by Statutes	**Prof. Nanda J. Puri**	Member
25 (2) iv	One Person nominated by the Kuladhipati preferably from amongst the members of the Sanskrit SthayiSamiti of the Government of Maharashtra.	**Dr. Amba Kulkarni**	Member
25 (2) v	One member of the Maharashtra Legislative Assembly to be nominated by the Speaker of the Maharashtra Legislative Assembly.	Vacant	Member
25 (2) vi	One member of the MLC to be nominated by the chairman of the MLC	**Shri. Girish B. Vyas** MLA	Member
25 (2) vii	The Secretary, Higher Education or his nominee not below the rank of Deputy Secretary	**Principal Secretary,** Higher Education	Member
25 (2) viii	The Director of Higher Education or his nominee not below the rank of Joint Director of Higher Education	**Director,** Higher Education, Pune	Member
25 (2) ix	One Head of the University Department as prescribed by statutes	**Dr. Harekrishna Agasti**	Member
25 (2) x	One Head of a college, institute, or Pathashala as prescribed by statutes.	**Dr. Bhau Dandade**	Member
25 (2) xi	One teacher from the University Departments as Prescribed by statutes.	**Prof. Kavita S. Holey**	Member
25 (2) xii	One teacher who is not principal from amongst the teacher of the affiliated colleges and recognised institutions with ten year teaching experience as prescribed by statutes.	Vacant	Member
25 (2) xiii	One Adhyaksha of Adhyayan Mandala as prescribed by statutes	**Prof. Krishnakumar Pandey**	Member
25 (2) xiv	One member of the VidvatParishad nominated by the Kulaguru	**Prof. Madhusudan Penna**	Member
25 (2) xv	Sanchalaka – Niyojana-Vikasa Mandala	**Prof. Vijaykumar C.G.**	Member
25 (3)	Kulasachiva – Secretary	**Prof. Vijaykumar C.G. (I/C)**	Member Secretary
25 (4)	Vitta-LekhaAdhikari	**Dr. Ramchandra J. Joshi**	Member
25 (4)	ParikshaNiyantraka	**Dr. Umesh D. Shivhare**	Member

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Academic Council

Sr. No.	Clause	Provisions	Name of the members
1	27 (2) (a)	The *Kulaguru*– Adhyaksha	**Prof. ShrinivasaVarakhedi**
2	27 (2) (b)	The *Sama-Kulguru*	--
3	27 (2) (c)	**The *Adhishthatas*of the *Sankayas*:**	
		1. Ved-Vidya	Prof. C. G. Vijayakumar
		2. *Sanskrit TathaSanskritetarBhasha*	Prof. Nanda J. Puri
		3. Bharatiya Dharma TatvadnyanTathaSanskruti	Prof. Madhusudan Penna
		4. PrachinBhartiyaVidyanTathaManvyashastre	Prof. Krishnakumar Pandey
		5. ShikshanshastraTathaSankirnaVidyashakha	Prof. Lalita Chandratrey
4	27 (2) (d)	**The *Adhyakshas*of the *Adhyayan Mandalas*:**	
		1. Board of Studies for Veda	Prof. C. G. Vijayakumar
		2. Board of Studies for *Vyakarana*	Prof. C. G. Vijayakumar
		3. Board of Studies for Sanskrit Language and Literature	Prof. Nanda Puri
		4. Board of Studies for PaliPrakrit and Modern Languages & Literature	Prof. Nanda Puri
		5. Board of Studies for Foreign Languages and Literature	Prof. Madhusudan Penna
		6. Board of Studies for Kirtanshastra	Dr. Dilip Dabir
		7. Board of Studies for *Darshanashastra*	Prof. Madhusudan Penna
		8. Board of Studies for Yoga and Alternative Therapy Methods	Dr. Kalapini Agasti
		9. Board of Studies for *Dharmashastra* and Ancient Indian *Vidhishastra*(Jurisprudence)	Prof. Madhusudan Penna
		10. Board of Studies for Visual Arts	Dr. Bhau Dandade
		11. Board of Studies for Performing Arts	Dr. Dinakar Marathe
		12. Board of Studies for VedangJyotish and Vastushastra	Prof. Krushnakumar Pandey
		13. Board of Studies for Humanities	Dr. Prasad Gokhale
		14. Board of Studies for Social Science and Social work	Dr. Hrushikesh Dalai
		15. Board of Studies for Psychology	Dr. Parag Joshi
		16. Board of Studies for Ancient Indian Sciences	Prof. Krishnakumar Pandey
		17. Board of Studies for Education	Prof. Lalita Chandratrey
		18. Board of Studies for Administrative Services	Dr. Harekrushna Agasti
		19. Board of Studies for Hospitality Studies & Travel & Tourism	Prof. Kavita Holey
		20. Board of Studies for Library & Information Science	Dr. Deepak Kapade

		21. Board of Studies for Computer Science and Application	Dr. Shivram Bhat
		22. Board of Studies for Commerce & Business Administration	Dr. Kirti Sadar
	27 (2) (e)	The *Sanchalaka*of the *VistarSeva Mandal*	Prof. Krishnakumar Pandey
	27 (2) (f)	One principal each of the conducted or affiliated colleges, institutions or *pathashalas* to be nominated by rotation.	Dr. Sikandar Manware
	27 (2) (g)	One professor from amongst the professors in the university departments or institutions, nominated by the *Kulaguru*	Vacant
	27 (2) (h)	One teacher representing each faculty to be coopted by the *Vidvat-Parishad* from amongst the teachers having not less than 10 years teaching experience, other than Principals of colleges, Heads of university departments and Heads of recognized institutions.	---
	27 (2) (i)	One head of an academic services unit of the university, nominated by the *Kulaguru.*	Mrs. Anagha Ambekar
	27 (2) (j)	Two scholars nominated by the *Kuladhipati*from amongst the Sanskrit institution in the State.	Vacant
	27 (2) (k)	Two eminent Sanskrit scholars nominated by the *Kulaguru*	Vacant
	27 (2) (l)	The Director of Higher Education, Maharashtra State or his nominee not below the rank of Joint Director, Higher Education or his nominee.	Director
	27 (2) (m)	Honorary Sanskrit Organizer, if any, of the Government of Maharashtra	Vacant
	27 (3)	The *Kulasachiva*shall act as the Secretary.	Dr. Ramchandra Joshi (I/c)

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Planning and Development (BPD)

Sr.No.		Members Name	Position
1	Kulaguru-Adhyaksha	**Prof. Shrinivasa Varakhedi** Hon'ble Vice-Chancellor.	Chairperson
2	Sama-Kulaguru if any (The Pro-Kulaguru)	**----**	Member
3	One Dean of Faculty, nominated by the VidvatParishad	**Prof. Krishnakumar Pandey,** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Ramtek	Member
4	One Head or Director from amongst the Heads or Directors of the University Institutions or departments, not below the rank of Professor and who is not a Dean nominated by VidvatParishad.	**Prof. Lalita Chandratre,** Dean, Faculty of Education and other Branches of Learning, KKSU, Ramtek.	Member
5	One teacher imparting post-graduate instruction having not less than sixteen years of teaching experience, nominated by Kulaguru.	**Prof. Kavita Holey,** Professor, Faculty of Sanskrit and other Languages, KKSU, Ramtek.	Member
6	One teacher imparting under-graduate institution having not less than sixteen year of teaching experience, nominated by VyavasthapanaParishad.	**Dr. Harekrushna Agasti,** Associate Professor, Department of Veda and Vyakarana, KKSU, Ramtek.	Member
7	One principal of an affiliated College of Sanskrit, nominated by the VyavasthapanaParishad from among the principal who are members of the VidvatParishad.	**Dr. Kirti Sadar,** Principal, Kalidas University's B.Ed. College,Ramtek.	Member
8	One principal of an affiliated professional College nominated by Kulaguru.	**Dr. Bhau Dandade,** Principal, Central India School of Fine Arts, Nagpur.	Member
9	Two experts, co-opted by the Board from amongst the Heads of National and State Level research institutions.	**Prof. Rajaram Shukla,** Vice-chancellor, Sampurnanand Sanskrit University, Banaras.	Member
10		**Prof. Mohan Khedkar,** VNIT, Nagpur.	Member
11	Sanchalaka of Niyojana-Vikasa Mandala-Member Secretary,	**Dr. Prasad Gokhale,** Director (I/c), B.P.D., KavikulaguruKalidas Sanskrit University, Ramtek.	Member Secretary

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Examination

Sr. No	Name	Position
01	**Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kaldassanskrit University Ramtek	Chairman
02	**Prof. Nanda Puri** Dean, Faculty of Sanskrit & Other Languages Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
03	**Prof. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & Culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
04	**Prof. C.G. Vijaykumar** Dean, Faculty of VedVidya Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
05	**Prof. Krishnakumar Pandey** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
06	**Prof. LalitaChandratre** Dean, Faculty of Education and SankirnaVidyashakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
07	**Dr. Hrushikesh Dalai**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
08	**Dr. Shivram Bhat**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
09	Hon'ble **Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
10.	**Dr. Umesh Shivhare** Controller of Examination Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member-Secretary

वार्षिक अहवाल
मराठी

प्रकरण पहिले
विभागनिहाय अहवाल

वेद तथा व्याकरण विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – वेदविद्या संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. शास्त्री, आचार्य तथा विद्यावारिधी इ. (वैदिक साहित्य, व्याकरणशास्त्र)

अधिष्ठाता – प्रो. डॉ. विजयकुमार सी. जी.

विभाग प्रमुख – डॉ. हरेकृष्ण अगस्ती, सहयोगी प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. शिवराम भट्ट (लिनवर), डॉ. जयवंत चौधरी

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 04

उद्देश –

- प्राचीन वैदिक साहित्याचे अध्ययन–अध्यापन व संशोधन करणे.
- आधुनिक विज्ञान वा अन्य शाखांशी वैदिक साहित्याचे आंतरविद्याशाखीय अध्ययन व संशोधन करणे.
- वेदांगांचे अध्ययन व संशोधन करणे.
- व्याकरणशास्त्राचे पारंपरिक गुरूकुल पद्धतीने अध्यापन व संशोधन करणे.
- शास्त्रांचे संरक्षण, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण करणे.
- संस्कृत संभाषण शिबिरांच्या माध्यमातून संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- नव्य आणि प्राचीन व्याकरणावर आधारित संशोधनास प्रोत्साहन देणे.
- संस्कृत व्याकरणाच्या दुर्मीळ हस्तलिखितांचे विद्यावारिधी पदवीसाठी संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.
- विभागातील प्राध्यापकांचे महद् संशोधन प्रकल्पासाठी योगदान.
- गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी तज्ज्ञ विद्वज्जनांची व्याख्याने पीएच्.डी संशोधनासाठी आयोजित करणे.
- व्याकरणाचे शास्त्रीय ग्रंथ ई–पुस्तक स्वरूपात उपलब्ध करवून देणे.
- आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे.
- वर्तमानयुगातील गरजा लक्षात घेवून संशोधनक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने संशोधक छात्रांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

वेद तथा व्याकरण विभाग

1) **संस्कृत संभाषण वर्ग –**

दि. १६–०७–२०१८ ते २५–०७–२०१८ पर्यंत

युवा विद्यार्थ्यांमध्ये तसेच समाजातील जनसामान्यांमध्ये संस्कृत भाषेबद्दल रुची निर्माण करण्याकरिता कटिबद्ध असलेल्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे दि. १६ ते २५ जुलै २०१८ या कालावधीत संस्कृत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाचा शैक्षणिक परिसर एन.आय.टी. कॉम्प्लेक्स सीताबर्डी नागपूर येथे दररोज दुपारी १२ ते 2.०० या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन दि. 16.07.2018 रोजी करण्यात आले. उद्घाटन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कविता होले, विभाग प्रमुख, संस्कृत साहित्य विभाग उपस्थित होत्या. संस्कृत वाङ्मयात उपलब्ध तत्त्व आत्मसात करायचे असल्यास भाषा कळल्याशिवाय ते शक्य होणार नाही असे त्यांनी सांगितले. संभाषणाशिवाय भाषेची गोडी लक्षात येणार नाही असेही प्रतिपादन त्यांनी केले. दैनंदिन संभाषणाद्वारे भाषा अवगत होईल आणि त्याने शास्त्राध्ययन सुकर होईल असे मत त्यांनी मांडले. उद्घाटनाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी उपस्थित होत्या. आधुनिक काळात तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांची सांगड घालायची असेल तर संस्कृतची उपयोगिता नाकारता येणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले. शास्त्रलेखन शैली तत्कालीन बुद्धिमत्तेचे उत्तम उदाहरण आहे जे संगणकीय युगात सुद्धा उपयोगी आहे. भाषा अवगत झाल्याशिवाय शास्त्र कळणार नाही म्हणून भाषा अवगत करण्यासाठी संभाषण शिबिर अत्यंत उपयोगी असल्याबाबतचे प्रतिपादन डॉ. नंदा पुरी यांनी अध्यक्षीय भाषणात केले. संभाषण शिबिराचे समन्वयक व वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी प्रास्ताविक केले.

प्रत्येक वर्षी वेद तथा व्याकरण विभागातर्फे आयोजित केल्या जार्णाया संभाषण शिबिरांद्वारे संस्कृत संभाषणाची विद्यार्थ्यांमध्ये रूची निर्माण करून संस्कृत शास्त्र अध्ययनात त्याचा उपयोग करून घेणे या हेतुने संभाषण शिबिराचे आयोजन केले जात असल्याबाबत त्यांनी स्पष्ट केले.

सदर शिबिरामध्ये नागपुरातील विविध महाविद्यालयांमधून विद्यार्थी तसेच समाजातील संस्कृतानुरागी व्यक्तिविशेष असे एकूण १११ विद्यार्थी सहभागी झाली होते. शिबिरातील शिक्षक म्हणून वेद तथा व्याकरण विभागाचे छात्र श्री. रूपेश रूद्रकार आणि श्रीवरदा माळगे यांनी शिकविण्याची जबाबदारी पार पाडली. संभाषणासाठी उपयोगी व्याकरणाचे विविध अंग जसे– संधी, कारक इ. तसेच भगवद्गीतेचे श्लोक पाठांतर, वर्णोच्चारण कौशल्य, कथाकथन, दत्त कार्य, वाक्य रचना इ. विविध प्रयोगाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विश्वविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे विविध शास्त्रीय विषयांवर व्याख्याने सादर करण्यात आले. विविधांगी व परिपूर्ण ज्ञान घेऊन या शिबिराच्या विद्यार्थ्यांनी भरपूर आनंद घेतला.

शिबिराचे समापन दिनांक 25.07.2018 रोजी करण्यात आले. समापन कार्यक्रमात प्रमुखातिथी म्हणून मिलेनियम इंडिया फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. अशोक कक्रू उपस्थित होते. तसेच अध्यक्षस्थानी मा. कुलगरू डॉ. श्रीनिवास वरखेडी उपस्थित होते. वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता तथा विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. विजयकुमार सी.जी. उपस्थित होते. दशदिनात्मक संभाषण शिबिराचे इतिवृत्त डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी सादर केले. डॉ. अशोक कक्रू यांनी मिलेनियम इंडिया फाऊंडेशन संस्थेच्या कार्याबाबत माहिती दिली तसेच प्राचीन शारदा लिपीचे प्रशिक्षण व हस्तलिखितांचे संकलन करून त्यांचे प्रकाशन कार्य करत

असल्याबाबत स्पष्ट केले. क का. संस्कृत विश्वविद्यालयासोबत या संदर्भात काम करण्याचे आवाहन या निमित्ताने त्यांनी केले. शारदा लिपीच्या अध्ययनाने संस्कृत पंडितांची भूमी असलेल्या काश्मीर प्रांताची आणि इथल्या संस्कृतिशी नाळ जोडणे सोईस्कर होईल असे मत मा. कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी यांनी मांडले. संस्कृतशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा संबंध काश्मीरशी आहे म्हणून शारदा लिपीचे अध्ययन करणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे असे मत अध्यक्षीय भाषणात मा. कलगुरू यांनी मांडले. समापन कार्यक्रमाचे मंच संचालन डॉ. शिवराम भट्ट व धन्यवाद समर्पण डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.विद्यार्थ्यांनी शिबिराबद्दल मनोगत व्यक्त केले. उपस्थित विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्साह आणि प्रतिसादामुळे दशदिनात्मक संभाषण शिबिर उत्तमरीत्या पार पडले.

२) संस्कृत संभाषण वर्ग –२

२०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून रामटेक येथे स्थापित कविकुलगुरुकालिदास संस्कृत विद्यापिठाच्या परीसरात पहिल्यांदाच विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी रामटेक नगराच्या आजू बाजूच्या गावातील होते त्या विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचा गंध ही नव्हता. त्यांना संस्कृत भाषेविषयी माहिती व्हावी व संस्कृत भाषेप्रती त्यांची रुचि वाढावी या हेतूने वेद तथा व्याकरण विभागाद्वारे १३ ते २२ अगस्त २०१८ या कालावधीत संभाषण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या संभाषण वर्गाचे उद्घाटन १३ अगस्त २०१८ रोजी झाले. उद्घाटन कार्यक्रमाला वेदविद्या संकाय प्रमुख व विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे संचालक डॉ. विजयकुमार सी. जी. अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच मुख्य अतिथि म्हणून रामटेक परिसराचे संचालक डॉ. ऋषिकेश दलाई प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचा प्रारंभ वेद मंत्रांनी झाला. सर्वप्रथम वेद तथा व्याकरण विभाग प्रमुख डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी वर्गाचे प्रास्ताविक केले. त्या नंतर प्रमुख अतिथिंचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात संस्कृत भाषेचे महत्व सांगितले तसेच संपूर्ण विश्व आज संस्कृत भाषेकडे मोठ्या आदराने बघत आहे. विदेशामध्ये सुद्धा संस्कृत भाषेची व संस्कृत प्राध्यापकांची मोठ्या प्रमाणात मांगणी आहे. या करिता आपण संस्कृ तचे अध्ययन करून आपली जीविका नक्की करू शकतो असे त्यांनी सांगितले. संभाषण वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिवराम भट व आभार प्रदर्शन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

संभाषण वर्गाला प्राक्शास्त्री, शास्त्री, आचार्य, बीबीए, बीसीए, लोक प्रशासन या सर्व वर्गांमध्ये नवीन प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी रोज उपस्थित असायचे. हा वर्ग सायंकाळी ५ ते ६ या वेळेस असायचा. संस्कृत संभाषण शिकण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना प्राध्यापिका श्रद्धा उपाध्ये व वैष्णवी दाभेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

२२ अगस्त रोजी संस्कृत संभाषण वर्गाचे समापन झाले. समापन कार्यक्रमाला संस्कृत भारतीचे श्री मोहन खेडकर हे प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाला वेदविद्या संकाय प्रमुख व विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे संचालक डॉ. विजय कुमार सी. जी. अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. विश्वामध्ये सर्वत्र गती आहे. आवाज वेगाने प्रकट होतो. शब्द ध्वनीद्वारे प्रतिबिंबित होतात आणि भाषा शब्दांद्वारे बनते. आज बर्याच भाषा प्रचलित आहेत. परंतु त्यांचा काळ निश्चित आहे. काही शंभर वर्षे, काही पाचशे आणि काही हजार वर्षांपूर्वी जन्मलेला. तसेच, जेव्हा जेव्हा या भिन्न भाषा जन्माला आल्या तेव्हा त्या वेळी इतर भाषा अस्तित्वात आल्या. म्हणूनच, पूर्वीपासूनच भाषेचे ज्ञान असणे, नवीन भाषेस जन्म देणे कठीण काम नाही. तथापि, सामान्य मानवांनी कोणत्याही वैज्ञानिक आधाराशिवाय बांधलेल्या सर्व भाषांमध्ये भाषिक दोष दिसून येतात. या सर्व भाषा परिपूर्ण शुद्धता, स्पष्टता आणि वैज्ञानिकतेची कसोटी घेत नाहीत. कारण ते कोणत्याही सूक्ष्म–वैज्ञानिक विचारविना तयार

केले गेले आहे जे फक्त आणि फक्त एकमेकांच्या गोष्टी समजून घेण्याच्या उद्देशाने केले गेले आहे. परंतु मानवी उत्पत्तीच्या प्रारंभीच्या काळात पृथ्वीवर कोणतीही भाषा अस्तित्वात नव्हती असे मत आपल्या भाषणात माननीय प्रमुख आथितींनी मांडले. माननीय अध्यक्षांनी सांगितले की संस्कृतमध्ये १७०० धातू, ७० प्रत्यय आणि ८० उपसर्ग आहेत। त्यांच्या बेरजेतून तयार झालेल्या शब्दांची संख्या २ लाख २० हजार आहे. जर आपण दोन शब्दांचे बनविलेले संमिश्र शब्द एकत्र केले तर त्यांची संख्या सुमारे ७६९ कोटींवर पोचते.

संस्कृत ही इंडो–युरोपियन भाषेची सर्वात प्राचीन भाषा आहे आणि सर्वात वैज्ञानिक भाषा देखील आहे. संस्कृतमध्ये बहुतेक श्लोक त्याच्या सकारात्मक लाटांमुळे आहेत. इ संस्कृतशी लोकांचा संबंध भारतात संपत आहे पण परदेशात त्याकडे कल वाढत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरेकृष्ण अगस्ती, संचालन डॉ. शिवराम भट व धन्यवाद समर्पण डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करून या वर्गाचे समापण झाले.

३) ग्रन्थप्रदर्शिनी –

प्रत्येकाने सतत कोणत्याही एका पुस्तकाचे वाचन करणे आवश्यक आहे. कारण पुस्तके हि आपणांस ज्ञान देवून जीवन जगण्याचा मार्ग दाखवितात. वाचनामुळे अनेक गोष्टी आपल्याला समजतात कळतात. मनुष्याचा सर्वात जवळचा मित्र म्हणजे ''पुस्तक'' होय . आपली एका पुस्तकाशी मैत्री झाली तर त्याद्वारे आपणांस अनेक पुस्तकरुपी मित्र भेटतात. आपल्या आयुष्यात ग्रंथांचे, पुस्तकांचे खूप महत्व आहे. ज्या देशांनी संस्कृतींनी ग्रंथांचे, ज्ञानाचे महत्व ओळखले त्या देशांची भरभराट झाली. त्या देशांचा, त्या भागाचा विकास संतुलित पद्धतीने झाल्याचे आपणांस दिसून येते. ग्रंथ वाचनाने आपण सतत समृद्ध होत असतो. पुस्तकामुळे बाहेरील नविन जगाची ओळख होते. या ग्रंथामुळे अनेकांना ओळख मिळाली आहे. या उद्देशाने दिनांक १५.०९.2०१७ रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे ग्रंथालय विभागाच्या मदतीने ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. वेद व व्याकरणसंबधी सर्व ग्रंथ प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आले होते. या ग्रन्थप्रदर्शनीचे उद्घाटन क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सी. जी. विजयकुमार यांच्या हस्ते झाले. सर्व संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व वेद तथा व्याकरण विभागाचे सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. एम.ए. संस्कृत वेद व व्याकरण शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी याचा पूर्णपणे लाभ घेतला. प्रारंभी दीपप्रज्वलन करुन ग्रन्थप्रदर्शिनीची सुरुवात झाली.

प्रास्ताविकात वेद तथा व्याकरण विभाग प्रमुख डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कमी होत चाललेल्या वाचनसंस्कृती वाढविण्याकरीता या ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या आधारे अ.क्र., पुस्तकाचे नाव, व्याख्याता, संपादक, टीका, प्रकाशक, विषयसूची, मूल्य अशा प्रकारचे एक प्रारूप तयार करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या.एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांच्या आधारे एका ग्रन्थाच्या किती टीका व टीकाकार आहेत, याबद्दल माहिती भरुन ठेवण्याकरिता सूचना देण्यात आल्या. सुचनाप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी हे काम सुचारुपणे केले.

ग्रन्थप्रदर्शिनीचे संपूर्ण संचालन प्रा. कार्तिक भाग्वत् यांनी तर अमित भार्गव यांनी आभार व्यक्त केले. यावेळी विद्यार्थी –विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशाप्रकारे ही ग्रन्थप्रदर्शिनी पार पडली.

४) राष्ट्रीय वैदिक संगोष्ठी –

महर्षि संदीपानी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठानाच्या सहकार्याने 'वैदिक यज्ञ व त्याची प्रासंगिकता' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय वैदिक चर्चासत्र कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे आयोजित करण्यात आले होते. दि २८.०६.2०१८ रोजी सकाळी १०.00 वाजता परिसंवादाचा उद्घाटन सोहळा दीपप्रज्वलनाने सुरू झाला. ज्यामध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी वैदिक मंगलाचरण व विद्यापीठ गीत सादर केले. त्यानंतर हा कार्यक्रम सादर करताना वेदविद्या संकाय प्रमुख डॉ. सी.जी. विजयकुमार म्हणाले की, 'वैदिक परंपरेचे जतन करणे' हे विद्वानांच्या जीवनाचे उद्दिष्ट आहे. परिसंवादाचे उद्घाटक म्हणून महर्षी संदीपानी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान उज्जैनी येथून आलेले आचार्य रविंद्र मुळे यांनी आपल्या उद्घाटन भाषणात सांगितले की 'धर्मजिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः' त्यानंतर वेदमूर्ती पंडितांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. वेदमूर्ती गणेश्वर शास्त्री द्रविड आचार्य जी यांना 'वेदशास्त्रसुधानिधि' ही पदवी दिली गेली. या संदर्भात वेदमूर्ती आचार्य देवदत्त पाटील आपल्या बीज भाषणात म्हणाले की कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी विवेकबुद्धी आवश्यक आहे. म्हणूनच विवेकबुद्धीचा अभ्यास वैदिक पाठशाळांमध्ये केला पाहिजे. सर्व लोक जगण्यासाठी इच्छित किंवा अप्रत्याशित द्विभाषिक कार्य करतात. त्या कार्यासाठी पवित्रता आवश्यक आहे. अशा प्रकारे यज्ञ विधीमध्ये विवेक। शुचिता आणि विद्येची गरज आहे. हे तिन्ही असूनही श्रद्धेशिवाय हे सर्व निरुपयोगी आहे. असे बोलून त्याने आपले भाषण संपवले. उद्घाटन सोहळ्यात रामटेक शहराचे आमदार जी मल्लिकार्जुन रेड्डीजी यांचेही स्वागत करण्यात आले. त्यानंतर कुलगुरूंनी अध्यक्षीय भाषण केले आणि वेद व व्याकरण विभाग प्रमुख डॉ. हरेकृ ष्ण अगस्ती यांनी आभार प्रदर्शन करून उद्घाटन सत्राची सांगता केली.

दुसरे सत्र

दुसरे सत्र दुपारी अडीच वाजता सुरू झाले. ज्यामध्ये वेदमूर्ती आचार्य श्रीधर अडी हे सत्राध्यक्ष होते. दुसऱ्या सत्रात ५ शोधपत्रांचे सादरीकरण झाले ज्यामध्ये वेदमूर्ती दिनकर जोशी यांनी वेदांगांची ओळख व त्यातील आवश्यकतेची ओळख करुन दिली. रितेश कुलकर्णी यांनी शौनक शाखेचा परिचय करून दिला. त्या नंतर वेदमूर्ति बलभद्र उपाध्याय यांनी योगा प्रक्रियेद्वारे रोग निवारण या विषयी आपणे शोधपत्र सादर केले. असा प्रकारे या सतराची समाप्ती झाली.

तिसरे सत्र

दुपारी साडेचार वाजता तिसरे सत्र सुरू झाले आहे. वेदमर्ती कृष्णशास्त्री आर्वीकर हे सत्राध्यक्ष होते. या सत्रामध्ये सर्वप्रथम वेदमूर्ती गणेश प्रसाद भट यांनी आपले विचार मांडले. त्यांच्या शोधपत्राचा विषय होता यज्ञ हा सर्व देवतांचा व प्राणांचा आत्मा आहे. त्या नंतर वेदमूर्ती कृष्णशास्त्री आर्विकर यांनी पंचमहायज्ञ या विषयी आपले विचार मांडले.

चवथे सत्र

वैदिक यज्ञ या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवसाचे चौथे सत्र व त्याची प्रासंगिकता २९–०८–२०१८ रोजी सुरू झाली. प्रारंभी मंत्राच्या जपानंतर विद्वानांनी शोधनिबंध सादर केले. अध्यक्ष होते महामहोपाध्याय आचार्य देवदत्त पाटील. ज्यामध्ये सर्वप्रथम वेदमूर्ती कृष्णा पळसकर जी यांनी सामवेदाच्या स्वाभाविक शाखेशी संबंधित चर्चा केली. जरी सहस्रवा सामवेद असे म्हटले गेले आहे, परंतु संप्रती सामवेदाच्या फक्त तीन शाखा उपलब्ध आहेत. राणायनीय शाखा, कौथुम शाखा, जैमिनीय शाखा.

वेदमूर्ती आचार्य रोहन कुलकर्णी जी यांनी सामवेदाच्या जैमिनीय शाखेशी संबंधित विषयावर चर्चा केली आणि त्यानंतर वेदमूर्ती प्रणव मुळे यांनी शुक्लयाजुर्वेदाच्या काण्वशाखेवर चर्चा केली. यानंतर, वेदमूर्ती आचार्य विवेक शास्त्री गोडबोले यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर चौथ्या सत्राचा समारोप वेदमूर्ती देवदत्त पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला.

पाचवे सत्र

त्यानंतर लवकरच पाचवे सत्र दुपारी १.०० वाजता सुरू झाले. या सत्रात तीन शोधपत्र सादर करण्यात आले. आचार्य मनोज मिश्रा या सत्राचे सत्राध्यक्ष होते. प्रथम वेदमूर्ती परशुराम परांजपे यांनी यज्ञ संस्थेत कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या महत्वाविषयी चर्चा केली. आणि त्यानंतर उन्मेष बोहटे यांनी ऋग्वेदातील यज्ञ या शब्दाच्या व्याख्येवर आपले व्याख्यान दिले. त्यानंतर श्रीमती शुचिता दलाल यांनी आपले विचार मांडले. त्या नंतर मनोज कुमार मिश्रा यांच्या भाषणाने या सत्राची सांगता झाली.

समापन सत्र

या वैदिक संगोष्टीचे समापण सत्र संध्याकाळी ४.०० वाजता सुरू झाले आचार्य मधुसूदन पेन्ना सत्राध्यक्ष होते. या सत्राअंतर्गत ३ पत्रे वाचण्यात आली. श्रीमती परांजपे यांनी श्रौत यज्ञातील व्यवस्थेबद्दल चर्चा केली. त्यानंतर वेदमूर्ती आकार सेलकर जी यांनी सध्याच्या श्रौतयागाची प्रासंगिकता काय आहे यावर आपले विचार मांडले.

समारोप सत्रात डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे इतिवृत्त वाचले. यानंतर प्रमुख वक्ते वेदमूर्ती गणेश शास्त्री द्रविड यांनी दोन दिवसांपासून चालू असलेल्या वैदिक यज्ञात भाग घेतलेल्या सगळ्यांचे अभिनंदन केले. आणि आत्मविश्वास व्यक्त केला की पुन्हा अशा परिसंवादाचे आयोजन करावे जेणेकरून तरुण विद्वानांना प्रेरणा मिळावी. यानंतर दोन दिवसांच्या वैदिक परिसंवादाचे संक्षिप्त दृश्य सादरीकरण झाले. या समारोप सत्राचे संचालन डॉ. शिवराम भट यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

5) अनुसंधान बैठक.

दिनांक ८ सप्टेंबर २०१८ रोजी वेद तथा व्याकरण विभागाद्वारे अनुसंधान बैठकीचे आयोजन करण्यात आले. वेद तथा व्याकरण प्रवाहातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी वेद व्याकरण विभागाद्वारे वार्षिक अनुसंधान

बैठकीचे आयोजन केले जाते. विद्यार्थी शैक्षणिक वर्षात त्यांनी काम केलेल्या संशोधन प्रकल्पांचे निष्कर्ष, प्रगति, प्रारंभ सादर करतात. हा कार्यक्रम दोन टप्प्यात घेण्यात आला –

१. तोंडी सादरीकरण

२. पीपीटी च्या माध्यमाने सादरीकरण

या अनुसंधान बैठकीमध्ये विभागात शोध करणाऱ्या एकूण ०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बैठकीत इतर विभागाचे मुले ही सहभागी झाले. सर्व मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

6) डॉ. एस.ए. डांगे स्मृती द्विदिवसीय व्याख्यानमाला

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेदविद्यासंकायांतर्गत वेदव्याकरण विभाग तथा संस्कृत भारती, विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध वेदज्ञ आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पुराविद्यातज्ज्ञ डॉ. सदाशिव अंबादास डांगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ द्विदिवसीय व्याख्यानमाला दि. 2६ व २७ मार्च २०१९ रोजी अनुक्रमे नागपूर व रामटेक येथे संपन्न झाली.

नागपूर व रामटेक येथे आयोजित व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी होते. वेदविद्या संकाय अधिष्ठाता प्रो. विजयकुमार, वेदव्याकरण विभागप्रमुख डॉ. हरेकृष्ण अगस्ती विशेषत्वाने उपस्थित होते. व्याख्यानमालेचा शुभारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वालनाने झाला. प्रास्ताविक वेदविद्या संकाय अधिष्ठाता प्रो. विजयकुमार यांनी केले. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या शुभहस्ते संस्कृत भारतीचे अखिल भारतीय शिक्षण प्रमुख डॉ. विश्वास यांचा शाल, श्रीफळ, फलस्तबक देवून सत्कार करण्यात आला.

ह्या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प दि. 2६ मार्च २०१९ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता मधुरम् सभागृह। विदर्भ हिन्दी साहित्य भवन। सीताबर्डी नागपूर येथे संस्कृत भारतीचे अखिल भारतीय शिक्षण प्रमुख डॉ. विश्वास 'सामान्यस्य कृते व्याकरणम्' 'सामान्यांकरिता व्याकरण' या विषयावर गुंफले.

डॉ. विश्वास यांनी सामान्यजनांकरिता व्याकरणाध्ययनाची आवश्यकता आणि महत्त्व अस्खलित व मधुर अशा संस्कृत भाषेत प्रतिपादन केले. डॉ. विश्वास म्हणाले, भाषा प्रथम अस्तित्वात आली आणि नंतर व्याकरण अस्तित्वात आले. साधु–असाधु शब्दांचा विचार करणारे व्याकरण हे शास्त्र असून संस्कृत भाषेत संभाषण करताना किमान व्याकरण माहित असावे, नव्हे ते शिकून घेतले पाहिजे. विविध व्याकरणविषयक ग्रंथांचे आणि कथांचे दाखले देवून व्याकरण शिकण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. भारतीय आणि पाश्चात्त्य यांचा भाषाविषयक दृष्टिकोन यात भेद आहे.

पाश्चात्त्य भाषा ही विचारांच्या आदानप्रदानाचे साधन मानतात तर भारतीय हे भाषा ही आदानप्रदानाचे केवळ साधन मानत नाही तर तिच्या शुद्धतेचा आग्रह धरतात. शास्त्रानुसार भाषेचा ज्ञानपूर्वक प्रयोग अर्थात् शुद्धज्ञानपूर्वक प्रयोगाचा आग्रह धरतात. भाषेचा ज्ञानपूर्वक प्रयोग हे धर्मोपत्तीचे साधन आहे, हा भारतीयांचा सिद्धांत आहे. पारंपरिक वैदिक, शास्त्र ज्ञानाचे रक्षण करणे हेच व्याकरणचे प्रयोजन आहे. प्रत्येक सामान्य व्यक्तीने व्याकरणाचे सामान्य ज्ञान करवून घेणे आवश्यक असून संस्कृत संभाषण करताना या ज्ञानाचा उपयोग होतो. शुद्ध भाषाध्ययन हे व्रत रूपाने अंगिकारावे हा व्याकरणाध्ययन करण्यामागचा आग्रह आहे. संस्कृत शुद्धपात अस्तित्वात

राहावी तसेच पुढील पिढीत संक्रमित करावी या उद्देशाने सर्वांनी किमान व्याकरणाध्ययन करावे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन डॉ. विश्वास यांनी केले.

दुसरे पुष्प दि. 27 मार्च २०१६ रोजी सकाळी ११. ०० वाजता प्रज्ञाभारती वर्णेकर सभागृह, शैक्षणिक भवन, रामटेक येथे डॉ. शान्तला संस्कृत भारतीच्या संस्कृत प्रचारिका. संस्कृत भारती, मंगलोर यांनी 'संस्कतप्रचारकार्ये अस्माकं योगदानम्' या विषयावर गुंफले. डॉ. शान्तला म्हणाल्या, 'संस्कृत भाषा ही सरल भाषा असून आपण रोज विविध प्रकारे संस्कृत भाषेचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे'. लोकांपर्यंत आपण पोहचून संस्कृत भाषेचा प्रचार–प्रसार करणे आपले कर्तव्य आहे. संस्कृत भाषेची गोडी लागण्यासाठी संभाषण शिबीर ही प्राथमिक पायरी आहे. या शिबीरांच्या माध्यमातून आपल्याला लोकांमध्ये संस्कृत भाषेप्रती प्रेम आणि जागरूकता निर्माण करणे शक्य होते.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी व्याकरणशास्त्र हे सूक्ष्मेक्षिका असून या शास्त्राच्या अध्ययनाने संस्कृत साहित्यादी अन्य शास्त्रांचे अध्ययन करणे सुलभ होते. त्यामुळे व्याकरणशास्त्र शिकणे अनिवार्य आहे. संस्कृत भाषेचे शिक्षण संस्कृतमधूनच झाले पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

दोन्ही व्याख्यानकार्यक्रमांचे संचालन अनुक्रमे डॉ. शिवराम भट, डॉ. सविता आर्या तसेच आभार डॉ. हरेकृष्ण अगस्ती, डॉ. जयवंत चौधरी यांनी मानले.

या व्याख्यानमालेला नागपूरातील नामवंत संस्कृत विद्वान, प्राध्यापक, विभाग प्रमुख, संस्कृतानुरागी, अभ्यासक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

7) विशेष व्याख्यान

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेदविद्यासंकायांतर्गत वेदव्याकरण विभागाद्वारे दिनांक ११–०२–२०१६ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोज करण्यात आले. संस्कृत व्याकरण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्याकरण शास्त्राचे अध्ययन कसे करावे या विषयी श्री शंकरयाचार्य संस्कृत विद्यापीठाच्या व्याकरण विभागाचे पूर्व विभाग प्रमुख महामहोपाध्याय श्री गंगाधर नायर यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलाने झाला. सर्वप्रथम वेद तथा व्याकरण विभाग प्रमुख डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी श्री गंगाधार नायर यांचा परिचय करून दिला व प्रास्ताविक केले. त्या नंतर प्रमुख अतिथींचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात व्याकरणाचे महत्व सांगितले तसेच संपूर्ण विश्व आज संस्कृत व्याकरणाकडे मोठ्या आदराने बघत आहे. विदेशामध्ये सुद्धा संस्कृत व्याकरण ज्ञानी प्राध्यापकांची मोठ्या प्रमाणात मांगणी आहे, त्यांनी व्याकरणाचे महत्व व व्याकरण शास्त्राचा अभ्यास कसा करावा या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वेदविद्या संकाय प्रमुख डॉ. सी. जी. विजयकुमार यांनी श्री गंगाधर नायर हे माझे गुरु आहे व आज मी जेवढे ही व्याकरणाध्ययन केले हे नायर महोदयांमुळेच असे बोलून त्यांनी गुरूंप्रती आपला आदर व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरू उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी श्री गंगाधर नायर यांनी संस्कृत व्याकरण शास्त्रात दिलेल्या योगदानाचे महत्त्व प्रतिपादित केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिवराम भट व आभार प्रदर्शन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

*****

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय

अभ्यासक्रम – 1 आगम संस्कृत, 2 आगम प्राकृत, 3 बी.ए. संस्कृत विशारद, 4 शास्त्री, 5 आचार्य, 6 एम्. ए., 7 एम्. फिल्., 8 विद्यावारिधी, 9 पीएच्. डी., 10 डी. लिट्. इ.

अधिष्ठाता – प्रो. डॉ. नंदा पुरी

विभाग प्रमुख – प्रो. डॉ. कविता होले

सहायक प्राध्यापक – डॉ. पराग जोशी, डॉ. राजेंद्र जैन

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 5

उद्देश –

- प्राचीन संस्कृत साहित्य, भाषा यांचे अध्यापन, संशोधन
- आंतरविद्या शाखीय व तौलनिक अध्यापन, संशोधनास प्रोत्साहन
- संस्कृत भाषा जनसामान्यांपर्यंत, संस्कृतानुरागींना सहज आत्मसात करता यावी यासाठी विशेष आगम, विशारद इ. अभ्यासक्रमांचे अध्यापन
- संस्कृतसह अन्य प्राचीन भाषा प्राकृत, पाली इ. भाषांचे अभ्यासक्रम जिज्ञासूंना उपलब्ध करवून देणे.
- संस्कृतसह जर्मन, फ्रेंच इ. विदेशी भाषांचे पदविका अभ्यासक्रम चालविणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- समकालीन संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र
- आंतरविद्याशाखीय संशोधन
- मार्गदर्शकांसह संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- संशोधक विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय रिसर्च मीट दर दोन महिन्यांनी आयोजित करणे

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे आयोजित विविध कार्यक्रमांचा व उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल –––

1) कालिदास दिवस समारोह –

दि. 13 जुलै 2018 रोजी कालिदास दिवसाचे आयोजन रामटेक येथील मुख्यालयात करण्यात आले. या प्रसंगी डॉ. गिरीश पांडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना कालिदास ग्रंथांबद्दल प्रेरक भाषण दिले. या प्रसंगी विश्वविद्यालयाच्या प्रभारी कुलगुरु व संकाय प्रमुख डॉ.नंदा पुरी यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. विश्वविद्यालयाचे सर्व सन्माननीय सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापकगण तसेच शिक्षकेतर सर्व कर्मचारी कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचा दुसरा भाग म्हणून सर्व अध्यापक व विद्यार्थ्यांनी कालिदास स्मारकाला भेट दिली.

2) गुरुपौर्णिमा–सर्वांनी विश्वविद्यालयातील विभागांसोबत विभागीय विद्यार्थ्यांनी दि. 27.7.2018 रोजी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर परिसरात केले. कार्यक्रमात वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. नंदा पुरी तसेच अन्य मा. सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. पुष्पगुच्छ प्रदान करीत सर्वविद्यार्थ्यांनी 'तस्मै श्री गुरवे नमः' या संस्कृतपदांना सार्थक केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.

3) संस्कृत सप्ताह समारोह –

दरवर्षी संस्कृतभाषेच्या प्रचार व प्रसाराच्या दृष्टीने विश्वविद्यालयाद्वारे संस्कृसप्ताहाचे आयोजन केले जाते. या वर्षी मा. कुलगुरूंच्या आदेशाने तसेच संकायप्रमुखांच्या मार्गदर्शनाने सप्ताहाचे आयोजन दि. 22.08.2018 ते 28.08.2018 या दरम्यान करण्यात आले. सदर सप्ताहांतर्गत 16 वेगवेगळया संस्कृतसंस्थांनी सहसमन्वयाने त्या–त्या ठिकाणी कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करून संस्कृतचा प्रचार व प्रसार केला.

संस्कृत सप्ताहाचे उद्घाटन दि. 22/08/18 रोजी मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेत झाले. प्रमुखातिथि म्हणून जम्मू व काश्मीर अध्ययन केंद्राच्या प्रमुख डॉ. मीराताई खडक्कार उपस्थित होत्या. प्रख्यात विदुषी डॉ. लीना रस्तोगी यांची तसेच मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांची विशेष उपस्थिती होती. सप्ताहाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. राजेंद्र जैन यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले. उद्घाटन समारंभानंतर प्रत्येक दिवस 16 संस्थांनी सातत्याने कार्यक्रमाचे आयोजन केले. सम्पन्न झालेल्या कार्यक्रमांची सांगता विद्यापीठातील निर्दिष्ट अध्यापकांनी विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून तिथे तिथे उपस्थित राहून यशस्वी पार पडली.

कार्यक्रमसूची–

कविकुलगुरुकालिदाससंस्कृतविश्वविद्यालयः रामटेकम्

✻✻ संस्कृतसप्ताहसमारोहः ✻✻

(२२ तः २८आगस्ट २०१८)

Sr.No.	Proposed Program	Institutions	Number of Participations	Number of Prizes	Certificate Sent
1.	**उद्घाटनं** अभिनवगुप्तावृतं विशेषव्याख्यानं च	Bhasha Pracharini Sabha, Nagpur &JKSC, Nagpur	00	00	00
2.	संस्कृतसांस्कृतिकस्पर्धा (नाट्य-नृत्य-गानस्पर्धाः)	Pratibhastali Jnyanodaya Vidyapeeth, Ramtek	65	03	68
3.	संस्कृतभाषणस्पर्धा आधुनिकजीवने संस्कृतस्य महत्त्वम्	Tirpude College of Hotel Management, Nagpur	15	03	18
4.	नाट्यकाव्याभिवाचनस्पर्धा	Sri Binzani Nagar Mahavidyalay, Nagpur	57	03	60
5.	एकदिवसीयकार्यशाला संस्कृते विज्ञानम्।	Skt Dept., C.P.& B erar College Nagpur	140+6	00	146
6.	संस्कृतचित्रगीतस्पर्धा (Film song competition)	LAD College, Ngp	17	03	20
7.	संस्कृतस्तोत्रगायनस्पर्धा	Administrate Service College, Morwa	39	03	42
8.	संस्कृतप्रबोधसामान्यज्ञानपरीक्षा स्पर्धा	Sanskrit Dept. Vasantroa nayik College, Nagpur	485	09	494
9.	संस्कृतनिबंधस्पर्धा	Bharatiya Utkarsh Mandal, near to Vivekanad Medical Mission, Khapari, Nagpur	122	03	125
10.	संस्कृतचित्रालेखस्पर्धा	Cisfa, Nagpur	77	03	80
11.	**संस्कृतदिनम्** संस्कृतगानस्पर्धा (संस्कृतस्तोत्र,गीत,भजन	KKSU **Ramtek Campus**	19	03 +03	22
12.	**कालिदासकाव्यशतावधानम्**	KKSU **Ramtek Campus**	00	00	00
13.	संस्कृतनिबंधवाचनस्पर्धा	Administrative College, Mahal	73	03	**76**
14.	शोभायात्रा	Sanskrit Bharati Nagpur	00	00	00
15.	संस्कृतसंदेशपत्रनिर्माणस्पर्धा	Alumni Association, KKSU, Nagpur	274	06	280
16.	एकदिवसीयकार्यशाला (संगणकीयक्षेत्रे संस्कृतभाषाव्याकरणस्य महत्ता।)	Sanskrit Dept., Nagpur Uni., Nagpur	80+14	00	94
		Total			**1526**

दि. 28.08.2018 रोजी मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेत सप्ताहसमारोहाचे समापन व पुरस्कार वितरण सोहळा सम्पन्न झाला. प्रमुखातिथी म्हणून महात्मा गांधी हिंदी विश्वविद्यालय, वर्धा चे मा. कुलगुरु प्रो. डॉ. गिरीश्वर मिश्र उपस्थित होते. तसेच स्वारस्वतातिथी म्हणून पुणे विद्यापीठाच्या पूर्वसंस्कृतविभागप्रमुख, डॉ. प्रो. सरोजा भाटे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मंगलाचरणसरस्वतीवंदना व विद्यापीठगीताने झाली. सप्ताह–समन्वयक डॉ. राजेंद्र जैन यांनी सप्ताहाचे आद्योपान्त इतिवृत्त प्रस्तुत केले. 16 संस्थांनी आयोजित कार्यक्रमातील पुरस्कार

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व बक्षीसे देण्यात आली, तसेच आयोजन– सहसमन्वयकांना अभिनंदन पत्रे देण्यात आहे. सारस्वतातिथींनी संस्कृतवर आधुनिक व व्यावहारिकस्तराने कार्य होण्याची आवश्यकता व्यक्त केली. प्रमुखातिथींनी विश्वविद्यालयाद्वारे प्रस्तुत आयोजनाने प्रभावित झाल्याची प्रशंसा केली व आधुनिक भारतीय हिंदी इत्यादी भाषांच्या अध्ययनासाठी संस्कृत अध्ययनाची गरज व्यक्त केली. मा. कुलगुरुंनी अध्यक्षीय भाषणात सर्वगोष्टींचा आढावा देवून कार्यक्रमांद्वारे होणा–या उद्दिष्टपूर्तीवर प्रकाश टाकला. मा. कुलसचिवांनी उपस्थित सर्वअधिकारी प्राध्यापकवृंद, सहसमन्वयकवृंद, पुरस्कार विजेते विद्यार्थी व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे समापन झाले.

4) संस्कृत अनुवाद कार्यशाळा :

राष्ट्रिय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या आर्थिक अनुदानाने विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभागातर्फे 21 दिवसांची संस्कृत अनुवाद कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा दि. 22जाने 2019 ते 14 फेब्रवारी 2019 या कालावधीत घेण्यात आली. 25 विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

या एकवीस दिवसांमध्ये दोन तास प्रतिदिन या प्रमाणे 42 व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानांमधून संस्कृतातील अनुवादावर विशेष भर देण्यात आला.त्यासाठी संस्कृत भाषेची रचना, व्याकरण, संस्कृत अनुवादातील अडचणी असे विषय घेऊन विद्यार्थ्यांकडून अनुवादाचा सराव करवून घेण्यात आला. तसेच संस्कृत ग्रंथांच्याही अन्य भाषांमध्ये भाषांतराची गरज लक्षात घेऊन संस्कृत ग्रंथांचे हिंदी,इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये भाषांतर करण्यात येणा–या अडचणींचे स्वरुप आणि त्यावरील उपाय हे विषयही व्याख्यानांमधून घेण्यात आले.

कार्यशाळेचा समापनाचा कार्यक्रम दि. 14 फेब्रु.2019 रोजी माननीय कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. कार्यक्रमाला नागपूर परिसराच्या संचालिका डॉ. कविता होले, वेदांग ज्योतिष विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रसाद गोखले उपस्थित होते. तसेच रातुम नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर संस्कृत विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. शुचिता दलाल विशेषत्वाने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नंदा पुरी यांनी केले. डॉ.प्रसाद गोखले यांनीही यावेळी आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या ऋणनिर्देशाचे दायित्व डॉ. कविता होले यांनी पार पाडले. कार्यक्रमाचे संचालन कु. मधुरा कायंदे हिने केले. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आले.

5) प्राकृत शिलालेख व लिपी साहित्यावर विशेष व्याख्यान –

कविकुलगुरू कालिदास संस्कृतविश्वविद्यालयाच्या संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायांतर्गत संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाद्वारे एकवर्षीय प्राकृत आगम डिप्लोमा पाठ्यक्रम गेल्या तीन वर्षांपासून चालविला जातो. संस्कृत व प्राकृत भाषांच्या व्याकरणाचे व साहित्याचे अध्ययन या माध्यमाने वर्षभरात केले जाते. या अभ्यासक्रमाच्या अतंर्गत विशेषत्वाने वर्षातून दोन विशेष व्याख्यानांचे आयोजन करून भाषा व साहित्याचा मर्म विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. याच दिशेने यावर्षीच्या प्रवेशित तसेच विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता दि. 06/10/2018 शनिवार रोजी ''भारतीयवाङ्मयास प्राकृत शिलालेखी साहित्य व ब्राह्मी लिपीचे योगदान'' या प्राकृतविषयावर विशेषव्याख्यानाचे आयोजन केले. विशेषव्याख्याता म्हणून सोलापूर येथील वालचंद कला महाविद्यालयातील संस्कृत–प्राकृतविभागाचे विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ. महावीर प्रभाचंद्र शास्त्री हे

उपस्थित होते. त्यांनी प्राकृत भाषा व साहित्यावर सामान्यतः प्रकाश टाकून शिलालेखीप्राकृतसाहित्याचा विशेषत्वाने उल्लेख केला. त्यातही ब्राहमी लिपीच्या मुलभूत योगदानावर प्रकाश टाकला. बाह्मी लिपीच्या उगम, विकास व योगदानाचे विवेचन पी.पी.टी. माध्यमाने प्रस्तुत केले.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी विभागप्रमुखा डॉ. कविता होले होत्या. व्याकरणविभागाचे प्राध्यापक डॉ. शिवराम भट्ट सर यांची विशेषउपस्थिती तसेच विभागीय प्राध्यापक डॉ. पराग जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख डॉ. कविता होले यांनी प्राचीनसाहित्याला उजागर करणा–या प्राकृत भाषा व साहित्यावर तसेच विशेषत्वाने लिपींवर शोध कार्य व पाठ्यक्रमनिर्मिती करण्याची नितांत गरज व्यक्त केली. विभागीय प्राध्यापक डॉ. पराग जोशी यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन समन्वयक डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले.

6) ग्रंथाध्ययन कार्यशाळा

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे चार दिवसीय ग्रंथाध्ययन कार्यशाळेचे आयोजन रामटेक परिसरात करण्यात आले होते. या कार्यशाळेत पदवी व पदव्युत्तर स्तरातील विद्यार्थ्यांकरिता 'चम्पूरामायण' या ग्रंथातील बालकाण्डाचे विशेष अध्ययन करवून देण्यात आले तसेच प्राक्–शास्त्री विद्यार्थ्यांना संक्षेपपंचतंत्र ग्रंथ शिकविण्यात आला.चम्पूरामायण ग्रंथाचे अध्यापन बंगलुरू येथील संस्कृत भारतीचे प्रकाशन प्रमुख व प्रसिध्द संस्कृत लेखक डॉ. विश्वास यांनी केले तर संक्षेपपंचतत्राचे पठन डॉ. शान्तला यांनी केले. दि. 25.03.19 रोजी सकाळी 9.00 वा. रामटेक परिसरातील सभाभवनात मा. कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेत कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी संस्कृत तथा संस्कृतेतरभाषा संकायाच्या मा. अधिष्ठाता डॉ. नंदापुरी, विभागप्रमुख डॉ. कविता होले व बीपीडी संचालक डॉ. विजयकुमार सर उपस्थित होते. दि. 25 ते 28 / 03 / 19 या दरम्यान रोज सकाळी 9 ते 11 व दु. 3 ते 4 वर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेकरिता एकूण 50 विद्यार्थी उपस्थित होते.

7) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विशेष व्याख्यान –

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर येथे शासनपरिपत्राकानुसार मराठी भाषा संवर्धन पंधरवाडयानिमित्त गुरुवार दि. 10.1.2019 रोजी विश्वविद्यालयाच्या नागपुर येथील शैक्षणिक परिसरात वाङ्मय मंडळातर्फे 'मराठी भाषा अभिवृध्दी' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्कृत तथा संस्कृतेतर संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांनी भूषविले. प्रमुख व्याख्याता म्हणून प्रसिध्द कवियित्री आणि साहित्य विहार संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशा पांडे उपस्थित होत्या. त्याचबरोबर विश्वविद्यालयाचे संस्कृत साहित्य विभाग प्रमुख आणि नागपुर परिसर संचालक प्रो. कविता होले आणि पदव्युत्तर शिक्षणशास्त्रा विभाग प्रमुख कीर्ती सदार उपस्थित होत्या. प्रो नंदा पुरी यांनी श्रीमती आशा पांडे यांचा शाल, श्रीफळ आणि कालिदास प्रतिमा देऊन सत्कार केला.

प्रमुख अतिथी श्रीमती आशा पांडे म्हणाल्या, मराठी भाषेचे संस्कार हे घरातून केले पाहिजेत. नवनवीन ज्ञानशाखा विकसित होत असतांना त्यासाठी असणा–या तांत्रिक संज्ञा मराठी भाषेत निर्माण केल्या पाहिजेत

तसेच त्या रुढहीकेल्या पाहिजेत. नव्या पिढीला आपली मातृभाषासण, उत्सव, परंपरा आणि संस्कृती यांचे ज्ञान मिळण्यासाठी मराठी भाषेची अभिवृध्दीची सुरुवात ही घरापासूनच केली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. नंदा पुरी यांनी संस्कृत भाषेत उपलब्ध ग्रंथ मराठी भाषेत अनुवाद करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे पाठवावा असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन कु. सायली पेशवे हिने केले. तर आभार प्रो.कविता होले यांनी मानले. या कार्यक्रमामध्ये विश्वविद्यालयातील अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी तसेच सहयोगी कर्मचारी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

8) IQAC अंतर्गत राष्ट्रिय चर्चासत्राचे आयोजन–

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्षातर्फे (IQAC) व विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद(नॅक) यांच्या संयुक्त प्रायोजकत्वाखाली आयोजित ''शिक्षणातील गुणवत्ता विकास आणि संस्कृत शिक्षणाच्या विशेष संदर्भात उच्च शिक्षण संस्थांमधील संशोधन'' या विषयावरील द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन आज शुक्रवार,दि.11 जानेवारी 2019 रोजी रामटेक येथे संपन्न झाले.

कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या चर्चासत्राच्या उद्घाटनाला प्रमुख अतिथी व बीजभाषक या नात्याने राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपतीचे सन्माननीय कुलगुरु प्रो. व्ही. मुरलीधर शर्मा उपस्थित होते. कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, चर्चासत्राच्या समन्वयक व IQAC संचालक डॉ. नंदा पुरी व चर्चासत्राच्या आयोजन समिती सचिव तसेच NAAC समन्वयक डॉ. कविता होले या व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ वेदमंत्रांच्या उद्घोषात मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाला. अमृता बरबडीकर आणि वैदेही कुळकर्णी या विद्यार्थिनींनी गायिलेल्या सरस्वती स्तवन आणि विश्वविद्यालय गीतानतर या राष्ट्रीय चर्चासत्राचे प्रास्ताविक चर्चासत्राच्या समन्वयक प्रो. नंदा पुरी यांनी केले.

राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपतीचे सन्माननीय कुलगुरु प्रो. व्ही.मुरलीधर शर्मा यांचा शाल, श्रीफळ, कालिदास प्रतिमा देवून कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी कुलगुरु प्रो. व्ही.मुरलीधर शर्मा आपल्या बीजभाषणात म्हणाले, गुणवत्ता, आर्थिक तरतूद आणि माहिती तंत्रज्ञान कौशल्य हे तीन घटक सर्व विश्वविद्यालयांसाठी विशेषतः सर्व संस्कृत विश्वविद्यालयाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी अवश्यंभावी आहेत. भारतात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला यासारख्या विद्यापीठांची अत्यंत गौरवशाली परंपरा होती. ही परंपरा पुनश्च निर्माण करुन आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठांच्या क्रमवारीत स्थान प्राप्त करावयाचे असेल तर गुणवत्तावाढ केल्याशिवाय पर्याय नाही आणि ही गुणवत्ता विद्यापीठांनी जाणीवपूर्वक कठोर परिश्रम करुन प्राप्त केली पाहिजे. विद्यापीठांमध्ये संशोधन, प्राध्यापक, शैक्षणिक कार्यक्रम, नैतिक मूल्ये आणि तत्त्वे, प्रशासकीय नेतृत्व आणि इ–गवहर्नन्स या सहा घटकांची गुणवत्ता आवश्यक आहे. जगातील आव्हाने पेलण्यास सक्षम, संस्कृती वमूल्ये पाळणारा समाज, उत्तरदायित्व स्वीकारणारा, ज्ञान व कौशल्यसंपन्न असा युवक निर्माण करणे हेच विद्यापीठांचे ध्येय असले पाहिजे. गुणवत्ता संवर्धनावर आधारित या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल प्रो.वरखेडी यांचे त्यांनी अभिनंदन केले.

विशेष अतिथी श्री. ना.गो. गाणार आणि डॉ. अर्चना नेरकर यांनी राष्ट्रीय चर्चासत्राला शुभेच्छा संदेश पाठविले.

याप्रसंगी विश्वविद्यालयातर्फे वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले तसेच डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी केलेल्या ''गुलाबगीता'' या काव्याच्या मराठी भाषांतराचे आणि डॉ. कीर्ती सदार, डॉ. कलापिनी अगस्ती, डॉ. शिवराम भट, डॉ. राजेंद्र जैन यांच्या अनुक्रमे शिक्षणशास्त्र, आहारशास्त्र, व्याकरण आणि संस्कृत साहित्यावर आधारित संशोधन प्रकल्पाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सर्वांचा सत्कारही प्रो. मुरलीधर शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी म्हणाले,''विद्यापीठाने केवळ रामटेक किंवा नागपूर अथवा महाराष्ट्रापुरता विचार न करता संपूर्ण भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गुणवत्तापूर्ण कार्यक्रम आणि संशोधन कार्य यांच्या आधारे स्थान प्राप्त केले पाहिजे. विद्यापीठाचा विस्तार भौगोलिक नसून शैक्षणिक व संशोधन स्तरावर होणे आवश्यक आहे. आज नागपुरातील महत्त्वाच्या पाच शैक्षणिक संस्थांमध्ये गुणवत्तापूर्ण कार्यक्रमांद्वारेच कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने स्थान प्राप्त केले आहे, परंतु एवढयापुरतेच न थांबता यापुढच्या वाटचालीत नवनवीन आव्हाने स्वीकारून, नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करीत प्रवाही राहणे आपल्यासाठी हितकारक आहे. यापुढील वाटचाल अधिक दमदार होण्यासाठी नियोजनपूर्वक गुणवत्तापूर्ण कार्यक्रम राबविण्यावर, समाज आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय राखत विश्वविद्यालय भर देईल.''

कार्यक्रमाचे संचालन मधुरा कायंदे हिने तर आभार प्रदर्शन आयोजन समिती सचिव प्रो.कविता होले यांनी केले. कार्यक्रमाची समाप्ती वंदे मातरम्ने झाली.

या चर्चासत्रात अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, विविध शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधन, विद्यार्थी, पत्राकार मोठया संख्येने सहभागी झाले होते.

या चर्चासत्रात उच्चशिक्षण क्षेत्रातील खालील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

- **डॉ. देवेंद्र कावडे – उपसल्लागार, नॅक, बंगलोर**
- **डॉ. प्रांतिक बॅनर्जी, उपप्राचार्य, हिस्लॉप कॉलेज, नागपूर**
- **डॉ. अखिलेश पेशवे, प्राचार्य, धरमपेठ म. पा. देव स्मृति विज्ञान महाविद्यालय, नागपूर**
- **डॉ. मंजुश्री सरदेशपांडे, विभाग प्रमुख, इंग्रजी विभाग, आर्.एस्. मुडंले धरमपेठ कला–वाणिज्य महाविद्यालय, नागपूर**
- **डॉ. मधुसूदन पेन्ना– अधिष्ठाता, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय, क.का.सं.वि, रामटेक**

या चर्चासत्राचा समारोप शनिवार, दि. 12 जानेवारी 2018 रोजी दुपारी 4.00 वाजता झाला. नॅक चे उपसल्लागार डॉ. देवेंदर कावडे यांचे ''नॅक प्रत्यायनाची सुधारित रूपरेषा'' या विषयावर विशेष सादरीकरण झाले.

राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ''स्वामी विवेकानंदाचे शिक्षणविषयक विचार आणि आजचा युवक'' या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे संचालन डॉ. दिनकर मराठे यांनी केले

असून प्रा. ब्रिजेश मानस, धर्मेद्र तूरकर, डॉ.भरत पांडा, डॉ. पराग जोशी आणि मधुरा कायंदे, मृदुला काळे, गौरव कडलग, अर्पिता हरडे हे वक्ते सहभागी झाले होते. समारोपाला रा. तु.म. नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ प्रमुख अतिथी म्हणून तर नागपूरचे आमदार श्री. गिरीश व्यास आणि नॅक उपसल्लागार देवेंद्र कावडे अतिथी या नात्याने उपस्थित होते.

या चर्चासत्रात प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

9) शिक्षक दिवस – आयोजन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात बुधवारी, दि. 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन नागपूर व रामटेक येथे करण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जगन्नाथ पाटील, (राज्यपालद्वारा नामनिर्देशित सदस्य (भूतपूर्व), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) उपस्थित होते. विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मा. कुलगुरू यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथी यांचा गुलाबपुष्प, शाल व कालिदासप्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, गुरू ही व्यक्ती नसून तत्त्व आहे. सध्याच्या युगात माहितीला महत्त्व आले आहे. परंतु, माहिती म्हणजे ज्ञान नाही. ज्ञानप्राप्तीची लालसा असणे व त्यासाठी परिश्रम करणे आता दुर्मीळ झाले आहे. उपनिषदातील नचिकेताची कथा सांगून डॉ. पाटील यांनी ईश्वराने सर्व शिक्षकांमध्ये वाईट विचार नष्ट करून सद्विचारांची रुजुवात व्हावी, अशी प्रार्थना केली. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांना अखिल मानवजातीच्या कल्याणाची तळमळ होती. त्यांच्या वाङ्मयातून हा विचार व्यक्त होतो. त्यांच्या कल्याणमयी विचारांचे आचरण आपण केल्यास खऱ्या अर्थाने शिक्षक दिन सफल होईल असे विचार मांडले. संचालन व आभार डॉ. पराग जोशी यांनी मानले.

या कार्यक्रमाला परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे संचालक, डॉ. विजयकुमार, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सहकारी, संस्कृतानुरागी, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

10) संस्कृत–एकांकिका– स्पर्धांचे आयोजन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने आयोजित संस्कृत नाटयमहोत्सवात संस्कृत भाषा प्राचारिणी सभेच्या 'गृहहीनः' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला. लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृह येथे या एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नटराज कला सांस्कृतिक केंद्राच्या सहकार्याने ही स्पर्धा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी उपस्थित होत्या. संस्कृत विदुषी डॉ. लीना रस्तोगी प्रमुख अतिथी होत्या. डॉ. कविता होले, यांची विशेष उपस्थिती होती.स्पर्धाचे निर्णायक म्हणून एलएडी कॉलेजच्या माजी संस्कृत विभागप्रमुख डॉ. स्मिता होटे,पुण्याचे पं. वसंत गाडगीळ आणि दिल्ली विद्यापीठाचे डॉ. बलराम शुक्ल उपस्थित होते. डॉ. पराग जोशी यांनी स्पर्धेची रूपरेषा मांडली. डॉ. पुरी यांनी नाटयमहोत्सवाचे स्वरूप स्पष्ट केले. महोत्सव समन्वयक डॉ. राजेंद्र जैन यांनी संचालन केले तसेच आभार मानले.

या स्पर्धेत सहा संस्कृत एकांकिका सादर करण्यात आल्या. स्पर्धेची सुरूवात संस्कृत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संस्कृत भाषेतील पंजाबी लोकनृत्याने झाली. नागपूरच्या ज्ञानविज्ञानवर्धिनी संस्थेने 'धन्या गृहस्थाश्रमः', संस्कृत विद्यापीठातर्फे 'गुरुदक्षिणा' सी. पी. ॲण्ड बेरार कॉलेजच्या वतीने 'सिकतासु तैलम', राष्ट्रभाषा परिवारच्यावतीने 'ब्रह्मराक्षस', संस्कृत भाषा प्रचारिणी सभेद्वारे 'गृहहीनः' आणि नटराज कला सांस्कृतिक केंद्र संस्थेच्यावतीने 'ललित कला' सांस्कृतिक केंद्र संस्थेच्यावतीने 'ललित कला' अशा एकांकिका सादर करण्यात आल्या. कार्यक्रमाला नागपुरातील संस्कृत विद्यापीठाशी संलग्नित विविध कॉलेजेसचे विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख तसेच शाखाप्रमुख उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी संस्कृत भाषा तथा साहित्य विभागप्रमुख डॉ. कविता होले, समन्वयक डॉ. राजेन्द्र जैन, डॉ. पराग जोशी, प्रा. पल्लवी कावळे यांनी परिश्रम घेतले. पुरस्कारांची घोषणा डॉ. पराग जोशी यांनी केली.

संस्कृत भाषा प्राचारिणी सभेच्या 'गृहहीनः' या संस्कृत नाटकाला प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झाला. सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालयातर्फे सादर करण्यात आलेल्या 'सिकतासु तैलम्' या नाटकाला द्वितीय क्रमांकाचा उत्कृष्ट निर्मितीचा पुरस्कार देण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी संस्कृत विद्यापीठाचे सत्यजित खटाळ आणि डॉ. विभा क्षीरसागर यांना प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय उत्कृष्ट प्रकाशयोजना, उत्कृष्ट नेपथ्य, उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट संगीतयोजना, उत्कृष्ट निर्देशक, उत्कृष्ट नाटयलेखन व अनुवाद असे पुरस्कारही देण्यात आले.

11) एकदिवसीय प्राकृत संगोष्ठी

क.का.सं.वि. हे संस्कृत भाषेसोबतच प्राकृत, पालीभाषा व साहित्याच्या अध्ययन, अध्यापन,संशाधन व प्रचार प्रसारा करिता सातत्याने प्रयत्नरत आहे. विश्वविद्यायलाच्या संस्कृत तथा संस्कृतेतरभाषा संकायाच्याअन्तर्गत संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे आगम पदविका प्राकृत हा एक वर्षीय पदविका अभ्यासक्रम गेल्या तीन वर्षापासून जोमात चालू आहे. या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत वर्षभर नियमित अध्यापन व सोबतच, किमान दोन बहिस्थ अनुभवी व्यक्तींची विशेषव्याख्याने तसेच मार्गदर्शन आजवर प्राप्त होत आहे.

या अनुषंगाने दि.30.3.2019 रोजी विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय प्राकृतभाषा– संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले. एक दिवसीय संगोष्ठीत दोन प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्याकरिता डॉ. बलराम शुक्ल, (संस्कृत विभाग,दिल्ली विश्वविद्यालय,दिल्ली) यांना आमन्त्रित करण्यात आले होते. संगोष्ठीच्या अध्यक्षस्थानी नुकत्याच विश्वविद्यालयाकडून संस्कृतजीवनवृती पुरस्काराने सम्मानित संस्कृतच्या प्रख्यात विदुषी डॉ. लीना रस्तोगी होत्या. कार्यक्रमात विभागीय सहायकप्राध्यापक डॉ. पराग जोशी यांची विशेष उपस्थिती होती. संगोष्ठीचा विषय **नाटय–सौन्दर्याभिवृद्वीत प्राकृतभाषांचे योगदान** असा होता. या अन्तर्गत डॉ. बलराम शुक्ल यांनी **1. कालिदासपूर्वकालिक संस्कृतनाटयसौन्दर्याभिवृद्वीत प्राकृतभाषांचे योगदान** व 2. **कालिदासोत्तर कालिक संस्कृत नाट्य सौन्दर्यभिवृद्धीत प्राक्तभाष ांचे योगदान** या दोन विषयावर विस्तृत मार्गदर्शन व मुक्त–चर्चा केली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीवन्दनेनेझाली. संगोष्ठीसमन्वयक डॉ. राजेंद्र जैन यांनी अतिथीसत्कार पुरस्कारवितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. यावर्षी प्राकृत पदविका पाठयक्रमात वर्षभर अध्यापन केलेल्या संस्कृतव्याकरणविभागातील प्राध्यापक डॉ. शिवराम भट यांना प्रथमपत्र– संस्कृतव्याकरण अध्यापन केल्याबद्दल, शोधच्छात्रा सौ. सरिता गिल्लुरकर हिला संस्कृतसाहित्याचे अध्यापन केल्याबद्दल,साहित्यविभागीय प्राध्यापक डॉ.

राजेंद्र जैन यांना द्वितीयपत्र–प्राकृतव्याकरणाचे अध्यापन केल्याबद्दल सौ. समता जैन यांना तृतीयपत्र–प्राकृतसाहित्याचे अध्यापन केल्याबद्दल मा. अध्यक्षा डॉ. लीना रस्तोगी व मंचावरील मान्यवरांच्या वतीने सम्मानित करण्यात आले. मा. अध्यक्षांनी भारतीयसंस्कृती व परंपराच्यायथास्थिती ज्ञानासाठी संस्कृत सोबत प्राकृत व अन्य प्राचीन भारतीय भाषांचे अध्ययन संशोधन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. तश्या अपेक्षांची पूर्तता प्राकृतभाषेवरील विशेषव्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्र यांच्या आयोजनांच्या माध्यमातून होतील असा त्यांनी विश्वास व्यक्त केला. डॉ. पराग जोशी यांनीचर्चासत्रात उपस्थितमान्यवरांचे आभार व्यक्त केले. चर्चासत्राचे समन्वयन डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले होते.

12) शैक्षणिक–सहल–

सदर शैक्षणिक वर्षात मार्च 2019 दरम्यान विश्वविद्यालयातील सर्व विभागीय विद्यार्थ्यांसमवेत शैक्षणिक सहल सावनेर–बैतुल रोड शिवतीर्थ ॲग्रो व्हिजन या ठिकाणी घेण्याचे ठरले. सहलीचे आयोजन संस्कृत साहित्य विभाग प्रमुख डॉ. कविता होले यांच्या मार्गदर्शनात झाले. सहलीत एकूण 50 विद्यार्थी तसेच प्राध्यापकांमध्ये डॉ. नंदा पुरी, डॉ. कविता होले, डॉ. दिनकर मराठे, डॉ. जयवंत चौधरी, श्री. सचिन डावरे व सौ. पल्लवी कावळे उपस्थित होते.

13) ग्रंथालय भेट –

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय व ग्रंथालयातील पुस्तकांविषयक अपेक्षित माहिती मिळण्याकरिता ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय भेटीने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांविषयक माहिती व जागृती निदर्शनास आली. पुस्तकांचे आदान – प्रदान करण्याबाबत ज्ञान मिळाले.

15. विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षीसे– खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुरस्कार व बक्षीसे

प्राप्त करुन यश संपादित केले.

1. तिरुपती छात्र प्रतिभा समारोह –

तिरुपती येथील राष्ट्रिय संस्कृत विद्यापीठात प्रतिवर्षीप्रमाणे गेल्या वर्षी दि. 30.01.2017 ते 02.02.2017 पर्यंत आयोजित झालेल्या 11व्या अखिल भारतीय संस्कृत छात्र प्रतिभा समारोहात कु. गौरी सोनटक्के (एम्.ए.प्रथम वर्ष) हिने एकपात्राभिनय स्पर्धेत भाग घेऊन तृतीय क्रमांक व प्रमाणपत्र पुरस्कार प्राप्त केला. याच स्पर्धांमधील संस्कृत गीतगायन स्पर्धांमध्ये प्राची भट हिला सांत्वना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले. या अखिल भारत वर्षीय स्पर्धांमध्ये विभागाच्या कु. माधुरी वैद्य, कु. वृषाली दाणी, कु. दिव्यानी अनमोलवार व कु. वैष्णवी दाभेकर या विद्यार्थीनींनी नृत्यस्पर्धेत पारितोषिक प्राप्त केले. कु. वेदश्री आर्वीकर हिने साहित्यशास्त्र भाषण स्पर्धेत सहभाग घेतला.

अखिल भारतीय संस्कृतच्छात्रप्रतिभासमारोह

तिरुपती – 2019

	नव	स्पर्धा	क्रमांक
1	प्रज्ञा करकरे	साहित्य भाषण, एकपात्री, एकांकिका	एकपात्री–तृतीय
2	अमृता बरबडीकर	सांख्य–योग भाषण, लोकनृत्य, संस्कृत गीतगायन स्पर्धा	.....
3	वैदेही कुळकर्णी	लोकनृत्य,	.....
4	भामा मेनन	लोकनृत्य, एकांकिका	.....
5	तृष्णा लांजुडकर	लोकनृत्य, एकांकिका	.....
6	तृप्ती लांजुडकर	लोकनृत्य, एकांकिका	.....
7	विजयालक्ष्मी खराबे	लोकनृत्य, एकांकिका	.....
8	कौशल जोशी	लोकनृत्य, एकांकिका, धर्मशास्त्रभाषण	.....
9	अनुज शर्मा	ज्यातिषभाषण, एकांकिका	.....
10	वीतराग वसवाडे	व्याकरणभाषण,लोकनृत्य , संस्कृतप्राविधिकस्पर्धा	संस्कृतप्राविधिक तृतीय
11	भूषण मुळे	वेदभाषण, एकांकिका	.....
12	परिक्षित झोडेकर	वेदान्तभाषण, लोकनुत्य एकांकिका, प्रश्नमंजुषा	.....
13	श्रेयस जदुबंशी	लोकनृत्य, अन्त्याक्षरी	.....
14	विशाल गोरे	पुराणेतिहासभाधण	.....

2. राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा मुंबई –

राष्ट्रीय संस्कृत संस्थान, मुंबई परिसराद्वारे राज्य स्तरीय शास्त्रीय स्पर्धाचे आयोजन डिसेंबर –2016 मध्ये करण्यात आले होते. या राज्यस्तरीय शास्त्रास्पर्धेत विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर (एम. ए. प्रथमवर्ष) भूषण मुळे (विशारद – तृतीय वर्ष), यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक व सुवर्ण पदक प्राप्त केले. कु. वेदश्री आर्वीकर हीने 'ध्वन्यालोक' ग्रंथाच्या शास्त्राशलाका स्पर्धेत भाग घेऊन राज्य स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला व भूषण मुळे याने रामायण (सुन्दरकाण्ड) च्या कण्ठस्थीकरण स्पर्धेत सहभाग घेऊन प्रथम क्रमांक प्राप्त केला.

महाराष्ट्र प्रान्तीय संस्कृत शास्त्रीय वाक्प्रतिस्पर्धा, मुंबई 2018–2019

1	श्रुती शर्मा	सांख्य भाषण	प्रथम
2	प्रज्ञा करकरे	साहित्यशलाका	प्रथम
3	देवेश्वर आर्वीकर	धर्मशास्त्रभाषण	द्वितीय

1	श्रुती शर्मा	सांख्यभाषण	–
2	प्रज्ञा करकरे	साहित्यशलाका	.....

3. संस्कृत सप्ताह स्पर्धांमधील सहभाग

नाव	वर्ग	महाविद्यालय	स्पर्धा	परितोषिक
प्रज्ञा करकरे		एल.ए. डी. महाविद्यालय	संस्कृत गीतगायन स्पर्धा	उत्तेजनार्थ
		श्रीमती बिंझाणी महाविद्यालय	संस्कृत काव्यनाटयवाचन स्पर्धा	प्रथम
अमृता बरबडीकर		एल.ए. डी. महाविद्यालय	संस्कृत गीतगायन स्पर्धा	प्रथम
		वसंतराव नाईक शासकीय कला तथा समाजविज्ञानसंस्था	संस्कृतप्रबोधसामान्यज्ञान परीक्षा संस्कृतनिबंधवाचन स्पर्धा	तृतीय
		प्रशासकीय सेवा पदवी महाविद्यालय		सहभाग
मैथिली अंजनकर		वसंतराव नाईक शासकीय कला तथा समाजविज्ञानसंस्था	संस्कृतप्रबोधसामान्यज्ञान परीक्षा	सहभाग
वैदेही कुळकर्णी		एल.ए. डी. महाविद्यालय	संस्कृत गीतगायन स्पर्धा	सहभाग
भामा मेनन		वसंतराव नाईक शासकीय कला तथा समाजविज्ञानसंस्था	संस्कृतप्रबोधसामान्यज्ञान परीक्षा	तृतीय
शुभम जांभूळकर		एल.ए. डी. महाविद्यालय	संस्कृत गीतगायन स्पर्धा	सहभाग

4. **राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा, अगरतला–**

राज्यस्तरीय शास्त्रा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर व भूषण मुळे यांची निवड राष्ट्रीय स्तरावर होणा–या शास्त्र स्पर्धांकरिता झाली होती. अगरतला येथील राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या परिसरात पार पडलेल्या अखिल भारतीय शास्त्र स्पर्धांमध्ये विभागाच्या कु. वेदश्री व चि. भूषण यांनी सहभाग घेतला.

5. **आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा हिस्लॉप कॉलेज, नागपुर –** नाट्याभिनय स्पर्धा (लिट मास्टर)

1. कौशल जोशी – द्वितीय
2. प्रज्ञा करकरे –
3. अमृता बरबडीकर – तृतीय
4. मैथिली अंजनकर –
5. भामा मेनन –

6. **आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपुर –**

दामले नाट्याभिनय स्पर्धा

1. कौशल जोशी – प्रथम
2. प्रज्ञा करकरे –
3. मैथिली अंजनकर –

7. **भारतीय संस्कृती परीक्षा स्पर्धा –**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी संस्थेच्या नागपुरशाखेच्या वतीने नागपुरातील शैक्षणिक संस्थांमध्ये भारतीयसंस्कृती परीक्षांचे आयोजन केले जाते. या वर्षी विश्वविद्यालयातील तसेच विभागातील एकूण 34 विद्यार्थ्यांनी या परीक्षेस नामांकन केले व कु. गौरी सोनटक्के, सौ. सुषमा गोखले, कु. प्रज्ञा करकरे, सौ. नंदिनी जठार, कु. ज्योती हसबनीस, कु.सोनाली महाजन, कु. वैष्णवी दाभेकर, कु.सायली पेशवे, कु.नयना भारसाकळे, या विभागीय विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेतला.

विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांतातर्फे भारतीय संस्कृती परीक्षेचे आयोजन शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी नुकतेच करण्यात आले होते. या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे एकदिवसीय शिबिरामध्ये गाडगे सभागृह, धरमपेठ मुलांची शाळा इथे घेण्यात आले. या शिबिरामध्ये कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या शास्त्री या पदवी अभ्यासक्रमाला शिकणाऱ्या प्रियंका बागडेने नागपूर जिल्हयातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच सुदर्शन भाटिया, राम शर्मा, हिमांशू वैष्णव, वैदेही गायकी, शिवाली सेनगुप्त, कनक शर्मा, स्वीटी डोले, रेश्मा वाघाडे, नेहा सोनगडे या विद्यार्थ्यांची सोलापूर येथ्ज्ञे डिसेंबर महिन्यात होणाऱ्या शिबिराकरिता निवड करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांचे मा. कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी अभिनंदन केले.

8. **कार्यशाळा–**

गत शैक्षणिक वर्षात विश्वविद्यालयात आयोजित संस्कृत अनुवाद कार्यशाळा राष्ट्रीय चर्चासत्र विशेषव्याख्याने व ग्रंथाध्ययन कार्यशाळेत विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यशाळेचा लाभ घेतला.

****

भारतीय दर्शन विभाग

स्थापना	–	वर्ष 2000
संकाय	–	भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय
अभ्यासक्रम	–	एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. दर्शनशास्त्र आणि योगशास्त्र
अधिष्ठाता	–	प्रो. डॉ. मधुसूदन पेन्ना
विभाग प्रमुख	–	डॉ. कलापिनी अगस्ती, सहयोगी प्राध्यापिका

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 4

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय धर्मविषयक तथ्यांचा अभ्यास करणे
- भारतीय दर्शन परंपरेचे अध्ययन व संशोधन करणे
- भारतीय आणि अन्य संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करणे
- भारतीय व पाश्चात्त्य दर्शन तसेच तत्त्वज्ञानविषयक विचार व ग्रंथ यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- संशोधनातील गुणवत्ता राखण्यासाठी आणि वाढविण्यासाठी संशोधनाधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- रूसा अंतर्गत काही संशोधन प्रकल्पांचा प्रस्ताव सादर.
- भारतीय दर्शन या अंतर्गत तसेच वेदान्त, योग–सांख्य दर्शन इ. मध्ये एम्. फिल्., आचार्य पदवीसाठी संशोधन

भारतीय दर्शन विभाग

भारतीय दर्शन विभागातर्फे आयोजित विविध कार्यक्रमांचा संक्षिप्त गोषवारा पुढीलप्रमाणे –

आंतरराष्ट्रीय योग दिवस – दि. 21.06.2018

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय भारतीय संस्कृती आणि प्राचीन शास्त्राांचे जतन करण्याकरीता कटिबद्ध आहे. त्यानुषंगाने प्राचीनयोगाचा प्रसार व प्रचार करणे हे विश्वविद्यालयाचे पर्यायाने भारतीय दर्शन विभागाचे आद्य कर्तव्य आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उपलक्ष्याने भारतीय दर्शन विभागाद्वारे एप्रिल, मे, जुन 2018 या तीन महिन्यांच्या कालावधीत समाजातील विविध ठिकाणी विविध घटकांसाठी योग प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाद्वारे एकूण 1801 व्यक्तींना योगाभ्यास,योग परिचय व योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

दिनांक 21 जुन 2018 रोजी आंतरराष्ट्रिय योगदिनानिमित्य शासन निर्देशानुसार क.का. संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर परिसरातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी योगाभ्यास वर्गाचे आयोजन सकाळी 07 ते 08 या वेळेत करण्यात आले.

या वर्गात शासनाने निर्गमित केलेल्या Common Protocol प्रमाणे डॉ. नवीन कौशिक व योग विभागातील विद्यार्थी यांनी योगाभ्यास करवून घेतला. तसेच रामटेक परिसरात सकाळी 10 ते 11 या वेळेत विश्वविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून श्री. राजेश चकिनारपुवार यांनी योगाभ्यास करवून घेतला.

सकाळी 10.00 वाजता मधुरम सभागृह हिंदी मोरभवन, सीताबर्डी येथे आंतरराष्ट्रिय योगदिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुखातिथी म्हणून श्री. श्रीनिवास वर्णेकर, अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. प्रो. श्रीनिवास वरखेडी, मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी व योगाभ्यासक अबनाश खुराणा, मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना व कार्यक्रमाच्या समन्वयिका भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती व्यासापीठावर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. योग विभागाच्या विद्यार्थीनी वैशाली चिडे यांनी वेदमंत्रा व शुभम जांभूळकर यांनी योगगीत सादर केले. त्यानंतर डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व विभागाद्वारे घेण्यात आलेल्या योगशिबिरांची माहिती दिली.

त्यानंतर योगविभागातील विद्यार्थ्यांनी योगप्रात्यक्षिक सादर केले. श्रद्धानंद अनाथ आश्रमातील विद्यार्थी यांनी "Save Girl Child" या विषयावर योगप्रात्यक्षिक सादर केले. योगविभागाची विद्यार्थीनी सुनिता वधावन हिने या अनाथ आश्रमात योगशिबीर आयोजित केले होते. त्याचेच हे प्रात्यक्षिक होते. याचवेळी श्री. अबनाश खुराणा वय 93 वर्ष यांनी एकूण 15 मिनीटे सर्वांगासनात स्थिर राहून योगाभ्यासाद्वारे स्वास्थ्याचे महत्व पटवून दिले.

त्यानंतर जागतिक योगपटु व योगविभागाची विद्यार्थिनी कु. धनश्री लेकुरवाळे हिने अप्रतिम योगप्रात्यक्षिक सादर केले. व त्यानंतर तिने प्रशिक्षीत केलेल्या चमुने योगप्रात्यक्षीकांचे सादरीकरण केले.

योगविभागाची विद्यार्थ्यांची गुणवत्ता व योगाचा प्रसार व प्रचार कार्यात त्यांनी केलेल्या योगदानाची पावती त्यानां द्यावी यास्तव आंतरराष्ट्रिय योग दिनानिमित्य या कार्यक्रमात श्री भरत गुप्ता आणि सौ. सरोज गुप्ता यांचा तसेच कु. धनश्री लेकुरवाळे हिचा शाल, नारळ, स्मृतिचिह्न व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर प्रमुखातिथी श्री. श्रीनिवास वर्णेकर यांनी ' भगवद्गीता आणि योग' या विषयावर अत्यंत सारगर्भ भाषण दिले. त्यानंतर योगविभागाद्वारे विवधि ठिकाणी योगप्रशिक्षणाचे आयोजन करणाऱ्या विद्यार्थ्यांना योगप्रशिक्षकाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले व सर्व सहभागी प्रतिनिधींनाही प्रमाणपत्र देण्यात आले.

मा. कुलगुरुंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात योगविभागाच्या प्रगतीचा वाढलेल्या आलेखाचा गौरव केला व यापुढे आंतरराष्ट्रिय स्तरावर योगविभागाची वाटचाल उत्तरोत्तर विकसित होवो ही सदिच्छा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे ऋणनिर्देश कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले तर संचालन सौ. शुभांगी नायब यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

❖ **शास्त्र भारती –**

सोमवार दि. 20 ऑगस्ट 2018 ला कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे शास्त्राभारती शास्त्रीय व्याख्यानमालेचे आयोजन रामटेक परिसरात करण्यात आले व्याख्यानमालेतील हे प्रथम सत्रा होते. या उपक्रमाद्वारे शास्त्राभारतीच्या विद्यार्थ्याकरीता विविध विषयांवर व्याख्यानाच आयोजन करण्याचा मानस आहे.

कार्यक्रमात नागपूर स्थित विश्वविद्यालयातील एम.ए. योगा व पी.जी. डिप्लोमा इन योगा या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच रामटेक परिसरातील विद्यार्थी उपस्थित होते. विश्वविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमात उपस्थित होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून म्हणून मा. कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी, मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना व कार्यक्रमाच्या समन्वयिका भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती व्यासपीठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीस पुष्प देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. या नंतर डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले व आधुनिक काळात योगीची उपयुक्तता या विषयावर मत मांडले. व विद्यार्थ्यांना शास्त्राभारतीच्या व्याख्यानमालेत आपल्याला पाहिजे असलेले विषय सुचवावे असे आवाहान केले.

तसेच आपल्या भाषणात मा. कुलगुरू यांनी भारतीय विज्ञान व भारतीय शास्त्र परंपरा यावर विवेचन केले, तसेच मूलभूत संशोधन मध्ये जास्त शोधकार्याची आवश्यकता असल्याचे मत प्रतिपादन केले. त्यानंतर भारतीय दर्शन विभागाच्या आंतरराष्ट्रीय योग दिवस अहवाल पुस्तीकेच व्यासपिठावर उपस्थित मान्यवरांदारे विमाचन करण्यात आले. त्यानंतर योगविभागाचे UGC NET Yog 2018 चे उत्तीर्ण विद्यार्थी सौ. सुनिता वधावन, कु. स्नेहल तिडके व अतुल गालेराव यांचा पुष्प व स्मतिचिह्न देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे ऋणनिर्देश भारतीय दर्शन विभागाच्या रेणुश्री बनसोड यांनी केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

❖ **शास्त्र भारती –**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातर्फे शास्त्राभारती ह्या शास्त्रविषयक .व्याख्यानमालेच्या अन्तर्गत शनिवार दि. 06–10–2018 रोजी विशिष्ट व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय अद्वैतवेदान्ते विवर्तवादस्वरूप हा होता. या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले विद्यापीठातील सहायक प्राध्यापक व सुप्रसिध्द कीर्तनकार डॉ. दिनेश रसाळ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी अद्वैतवेदान्तातील विवर्तवादाचे स्वरूप अत्यंत सहजगम्य वाणीने सोदाहरण उलगडून दाखविले.

संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना हयांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. त्यांनी आपल्या भाषणातून विवर्तवादाची भूमिका स्पष्ट करत इतर भारतीय दर्शनांचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती हयांनी केले. डॉ. रेणुका करंदीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व प्रा. रेणुश्री बनसोड यांनी उपस्थितांचे आभार मानले. या व्याख्यानमालेला दर्शनशास्त्राचे व योगशास्त्राचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

❖ **आचार्य भारती –** दि. 20.04.2018

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे दिनांक 20.04.2018 रोजी आचार्य श्रीशंकराचार्य आणि आचार्य रामानुजाचार्य यांच्या जयंतीनिमित्त

'आचार्यभारती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन सेमिनार हॉल, गुरुकुलम्, रामटेक येथे दु. 11 ते 03 या वेळेत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मा. स्वामी अभिषेक ब्रह्मचारी, वाराणसी आणि मा.रोहित कुमार सिंह, पटना हे मुख्यातिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मा. कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी व विशेष वक्ता म्हणून भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता मा. डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते. व्यासपीठावर मा. कुलसचिव व भारतीय दर्शन विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली यावेळी विश्वविद्यालयाचे विद्यार्थी श्री.देवेश्वर आर्वीकर याने वेदमंत्र सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले.

त्यानंतर सर्व मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर मा.श्री. रोहितकुमार सिंह यांनी उपस्थितांना उद्‌बोधित केले. मा. डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी 'श्रीरामानुजाचार्यांचे वेदान्ततत्त्वज्ञान' या विषयावर मार्गदर्शन केले. मा.कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी सर यांनी "श्रीशंकराचार्य आणि श्रीरामानुजाचार्यांचे वेदान्त तत्त्वज्ञान" या विषयावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. करपात्री धाम येथील स्वामी अभिषेक ब्रह्मचारी यांनी सभेला मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी वर्ग व शास्त्रजिज्ञासू मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांसाठी भोजनव्यवस्थेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम संपन्न झाला.

परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज प्रबोधिनी

16 वे वार्षिक अधिवेशन

परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज प्रबोधिनीचे 16 वे वार्षिक अधिवेशन ऑक्टोंबर महिन्याच्या 26, 27, 28 ह्या दिवसात सम्पन्न झाले. नागपूर मधील श्री. शिवाजी सभागृह (प.पू.नाना महाराज स्मृति स्थल (चैतन्य पीठ)) येथे शुक्रवारी दि. 26.10.2018 रोजी संध्याकाळी ग्रंथदिडी ने अधिवेशनाची सुरूवात झाली. शनिवार दि. 26.10.2018 रोजी सकाळी 9.30 पासून सुरू होणा–या प्रथम सत्रात प्रमुख रूपाने प. पू.श्री बाबा साहेब तराणेकर (डॉ. प्रदीप तराणेकर) डॉ. श्वेता जोजुरकर, डॉ. मधुसूदन पेन्ना, डॉ. संजय देशमुख ह्यांचे प्रवचन झाले व शेवटी सत्राध्यक्ष डॉ. जयेन्द्रशास्त्री दुबे ह्यांनी सत्राचे समालोचन केले.

महाप्रसादानंतर दुस–या सत्रात डॉ. वीणा गानू, सौ. स्नेहा शिंनखेडे, डॉ. श्रृतकीर्ति गणोरकर व डॉ. रेणुका करंदीकर ह्यांचे व्याख्यान झाले. या सत्राचे समालोचन सत्राध्यक्ष डॉ. श्वेता जेजुरकर ह्यांनी केले. त्यानंतर रविवारी अधिवेशनाच्या तिस–या दिवशी तृतीय सत्रात सत्राध्यक्ष डॉ. मधुसूदन पेन्ना, व्याख्याता डॉ. शुभांगी परांजपे व डॉ. जयेन्द्रशास्त्री दुबे ह्यांची व्याख्यानं झाली त्यानंतर मुक्त संवाद 'स्वामी महाराज के साहित्य व कार्य पर खुला चर्चा सत्र यामध्ये कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील बारा विद्यार्थ्यांनी पेपर रीडिंग केले त्यांचे विषय असे होते–

प्रथम सत्र

1. प.पू.श्री बाबा साहेब तराणेकर (डॉ. प्रदीप तराणेकर)

   – परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज के साहित्य में 'प्रस्थानत्रयी'

2. डॉ. श्वेता जोजुरकर

   – परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज के कृतियों में चतुर्विध पुरुषार्थ

3. डॉ. मधुसूदन पेन्ना

– वर्तमानयुग में परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज का दर्शनशास्त्र

4. डॉ. संजय देशमुख

– मंत्रशास्त्र और स्वामी महाराज का साहित्य

5. सत्राध्यक्ष डॉ. जयेन्द्रशास्त्री दुबे

दुसरे सत्र

1. डॉ. वीणा गानू – परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज का संस्कृत साहित्य में योगदान
2. सौ. स्नेहा शिंनखेडे – परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज के चरित्र एवं ग्रंथो में लोकशिक्षा
3. डॉ. श्रुतकीर्ती गणोरकर – परमपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज के योगशास्त्र पर विचार
4. डॉ. रेणुका करंदीकर – शिक्षात्रयी ग्रंथ की प्रासंगिकता
5. डॉ. श्वेता जोजुरकर (सत्राध्यक्ष)

समापन सत्राचे माननीय सत्राध्यक्ष डॉ. श्रीहरिप्रसाद एस. जोशी यांच्या प्रवचनानंतर समापन कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून माननीय श्री नितीनजी गडकरी यांची उपस्थिती लाभली. तसेच संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. माननीय नितीनजींच्या उद्‌बोधनानंतर आभार प्रदर्शन झाले व अधिवेशनाची सांगता महाप्रसादाने झाली.

❖ सूर्यनमस्कार शिबिर –

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे रथसप्तमी च्या दिवशी 'जागतिक सूर्यनमस्कार दिनाच्या' निमित्ताने विविध ठिकाणी सूर्यनमस्कार शिबीरांचे आयोजन करण्यात आले. समाजामध्ये योगाचा प्रचार व प्रसार करणे आणि जनसामान्यांपर्यंत योग पोहचविणे, ही या शिबीर आयोजनामागील मुख्य भूमिका होती. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी व त्यांना योगाची उपयुक्तता ज्ञात व्हावी या उद्‌देशाने क.का.सं.वि.द्वारे सूर्यनमस्कार शिबिर घेण्यात आले.

नागपूर, यवतमाळ, वर्धा आणि रामटेक या चार ठिकाणी एकूण 26 शिबिरांचे आयोजन करण्यात आले. विशेष रूपाने रामटेक येथील राष्ट्रीय आदर्श विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, श्री नरेन्द्र तिडके महाविद्यालय, प्रोव्हींडस कॉन्व्हेंट, ज्ञानदीप कॉन्व्हेंट व ज्युनिअर सायन्स कॉलेज, ताई गोळवलकर महाविद्यालय, श्रीराम हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, विद्यासागर कला महाविद्यालय, समर्थ हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज या महाविद्यालयांमध्ये एकूण **5020** विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार प्रशिक्षण देण्यात आले. या सर्व महाविद्यालयांनी सूर्यनमस्कार शिबीरासाठी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला व सहकार्य केले. त्याबद्‌दल विश्वविद्यालय त्यांचे आभारी आहे. तसेच नागपूर, यवतमाळ आणि वर्धा येथील एकूण **2010** विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार शिबिराचा लाभ घेतला.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातील संशोधक छात्र, विद्यार्थ्यांनी यांने अतिशय परिश्रम घेऊन या सूर्यनमस्कार शिबीरात सहभागी झालेल्या एकूण 7030 विद्यार्थ्यांना प्रशिक्षीत केले, त्याबद्‌दल विश्वविद्यालयाचे कुलगुरु मा. श्रीनिवास वरखेडी, अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, दर्शन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती व विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक व अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच समाजपयोगी असे उपक्रम यापुढे ही विश्वविद्यालयाद्वारे राबविले जातील असे आश्वासन दिले.

विद्यार्थ्यांचे यश

1. आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धा

कोलंबो, श्रीलंका येथे दि. 09 फेब्रुवारी 2019 ते दि. 12 फेब्रुवारी 2019 या कालावधीत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि नॅशनल इंन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स, कोलंबो, यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत संशोधन पत्रांचे सादरीकरण व विशेष रूपाने योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या योगासन स्पर्धेत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातील विद्यार्थीनी कु. प्रियंका वैरागडे हिने सहभाग घेतला व या स्पर्धेत सुवर्ण पदकासह प्रथम क्रमांक प्राप्त केला.

ही स्पर्धा कोलंबो येथील White Dunkan Hall येथे संपन्न झाली. या स्पर्धेत मॉरिशस, वेतनम, श्रीलंका आणि भारत या देशांमधील योगस्पर्धकांनी सहभाग घेतला होता. 22 ते 35 या वयोगटात प्रियंका वैरागडे हिनी प्रथम क्रमांक पटकाविला.

दि. 12 फेब्रुवारीला पारितोषिक वितरण समारंभ White Dunkan Hall मध्ये आयोजित करण्यात आला होता. श्रीलंकेतील क्रीडामंत्री हॅरील फॅर्नाडो व डायरेक्टर जी.एल.सजीथ जयलाल, भारताती अरूण खोडसकर, प्रो. रवी साहु प्रामुख्याने उपस्थित होते.

कु. प्रियंका वैरागडे हिने श्रीलंकेत झालेल्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत क.का.सं.वि. चे प्रतिनिधीत्व केले त्यामुळे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे तिला रू. 15,000/– चे आर्थिक अनुदान देण्यात आले होते.

2. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय योगस्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचे सुयश

विश्वविद्यालयात योगशास्त्राच्या अध्यापनामागे उत्तम योगशिक्षक घडविणे हा हेतू तर आहेच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन त्यांच्यात जिंकण्याची इच्छा विजिगिषा निर्माण करणे हा ही उद्देश आहे. त्यानुरूप विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाकडून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता व्हावे याकरिता आर्थिक अनुदानही देण्यात येते. दोन विद्यार्थ्यांना विभागातर्फे आंशिक अनुदान प्राप्त झाले व विद्यार्थिनींनी ही त्याचे चीज केले. त्यांनी मिळविलेल्या यशाचा आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

International achievement-

1) I won Bronze medal in World Yoga sports championship-2018 held at Argentina (south America)

2) I won Silver medal in 8th Asian Yoga Sports Championship-2018 held at Kerala

3) I won two Bronze medals in *43rd National Yoga sports championship-2018 held at Patiala (Punjab)

आंतराष्ट्रीय दर्शन परिषद – दि. 24, 25, मार्च 2019

रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय आणि भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद् यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित द्विदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद् राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभागाच्या हीरक महोत्सवाचे औचित्य साधून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा भारतीय दर्शन विभाग आणि भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद्, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''वर्तमान परिप्रेक्ष्यात भारतीय दर्शनाचा प्रभाव'' या विषयावरील द्विदिवसीय आंतरराष्ट्रीय

परिषद हि सोमवार दि. 24, 25 मार्च 2019 रोजी स्नातकोत्तर संस्कृत विभाग, गांधी भवन, अंबाझरी रोड नागपूर येथे घेण्यात आली.

द्विदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे इतिवृत्त प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी सादर केले. या परिषदेला संपूर्ण भारतभरातून 140 पेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच सुमारे 70 संशोधन निबंध सादर करण्यात आले. प्रमुख अतिथी डॉ. पंकज चांदे, विशेष अतिथी श्री. विकास सिरपूरकर,यांचा शाल, श्रीफळ, फलस्तबक आणि सन्मानचिह्न देवून सत्कार करण्यात आला.

या परिषदेला विविध महाविद्यालयांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, दर्शनशास्त्राचे संशोधक, विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. या परिषदेसाठी आयोजन समिती सदस्य डॉ. कलापिनी अगस्ती, डॉ. दिनकर मराठे, श्री. गौरव कडलग, प्रा. मंगेश पाठक, प्रा. अरुण पवार, प्रा. स्वीटी टेंभरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Research Meet

भारतीय दर्शन विभागातर्फे दि. 26.03.2019 ला विश्वविद्यालयाच्या नागपूर परिसर येथे Research Meet चे आयोजन स. 11.30 वाजता करण्यात आले. संशोधन कार्याची समीक्षा प्रो. मधुसूदन पेन्ना, डॉ. कलापिनी अगस्ती, डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले. विद्यावारिधीसाठी पंजीकरण झालेले सर्व संशोधन छात्र तसेच नवीन संशोधन छात्र या सभेत उपस्थित होते. पंजीकृत छात्रांनी त्यांचे संशोधन अहवाल सादर केले. तसेच नवीन छात्रांचे शोधनिबंधाचे विषय या सभेमध्ये निश्चित करण्यात आले. संशोधन कार्य उस्त्फूर्तपणे व नियमितरित्या न करणा–या संशोधन छात्रांचे पंजीकरण रद्द करण्यात आले.

पिबेत् भागवतम्

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे **'पिबेत् भागवतम्'** या सप्तदिनात्मक विशिष्ट प्रवचन मालेचे आयोजन दि. 22 एप्रिल 2019 ते 30 एप्रिल 2019 या कालावधीत करण्यात आले होते. श्रीमद्भागवतातील विविध कथांच्या तात्पर्यार्थाची घडी उलगडून त्यातील मध्वामृतांशाच्या रसपूर्णविवेचनाचा आस्वाद परमादरणीय डॉ. मधुसूदन पेन्ना यांच्या सहजमधुर वाणीद्वारे तत्त्व जिज्ञासूंना प्राप्त झाला. दि. 30 एप्रिल 2019 रोजी वल्लभाचार्यांच्या जयंती पर्वावर या भागवत प्रवचन यज्ञाची सांगता झाली.

'आचार्य भारती' व्याख्यानमालेच्या

'आचार्य भारती' या शास्त्राव्याख्यानमालेच्या अनुषंगाने दि. 20 ऑगस्ट 2018 रोजी 'विज्ञान आणि शास्त्र' या विषयावर विश्वविद्यालयाच्या माननीय कुलगुरुंचे प्रो. श्रीनिवास वरखेडी यांचे व्याख्यान झाले. विज्ञान व शास्त्र यांचा संबंध, त्यांमध्ये आवश्यक असलेले संशोधन याविषयावर मा.कुलगुरुंनी उद्बोधन केले.

या कार्यक्रमांतर्गत नेट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच 21 जून 2018 च्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या अहवालाचे मा. कुलगुरुंच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमास भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना, तसेच भारतीय दर्शन विभागाच्या प्रमुख मा. डॉ. कलापिनी अगस्ती उपस्थित होत्या व विश्वविद्यालयाच्या नागपूर परिसर येथील सर्व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

गीता जयंती उत्सव

दि. 19 डिसेंबर 2018 रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे 'गीताजयंती' उत्सव साजरा करण्यात आला.

श्रीमद्भगवद्गीता हा जगातील एकमेव ग्रन्थ असा आहे की, ज्यांची जयंती साजरा केली जाते. अशा महनीय ग्रंथाच्या अध्ययनाविषयी व कंठस्थीकरणाविषयी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह्यावेळी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी, संस्कृत भाषा

तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या मा. अधिष्ठाता, डॉ. नंदा पुरी, प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र संकायाचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, साहित्य विभाग प्रमुख व विश्वविद्यालयाच्या नागपूर परिसर संचालिका, डॉ. कविता होले, भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती, सहा. प्राध्यापक डॉ. शिवराम भट्ट व विश्वविद्यालयाचे सर्व छात्र तसेच कर्मचारी उपस्थित होते. सगळ्यांनी मिळून भगवद्गीतेच्या 12 व 14 व्या अध्यायाचे पठन केले. भगवद्गीतेचे अठराही अध्याय पाठ असलेल्या अद्वैत आर्वीकर, बी.ए. संस्कृत विशारद ह्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांने प्रथमाध्यायाचे पठन केले.

प्रो. वरखेडी यांनी कर्मयोग व कर्मसंन्यासयोग ह्याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. नन्दा पुरी ह्यांनी भगवद्गीतेचे मॅनेजमेंटच्या दृष्टीने महत्व प्रतिपादित केले तर डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी भगवद्गीतेचे समुपदेशनातील महत्व प्रतिपादित केले. डॉ. कलापिनी अगस्ती ह्यांनी गीतेतील योग व त्यांच्या छटा ह्या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सांगता एकात्मता मंत्राने झाली. कार्यक्रमाचे संचालन व ऋणनिर्देश डॉ. रेणुका करंदीकर ह्यांनी केले.

शास्त्रभारती व्याख्यानमाला

दि. 27 डिसेंबर 2018 रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे शास्त्राभारती या शास्त्रीय या व्याख्यानमालेत "The Importance of Sweda in Yogic Practice" या विषयांवर चन्द्रमौलिजी शिवशंकराप्पा नायकर ह्यांचे व्याख्यान झाले. डॉ. नायकर हे कर्नाटक युनिव्हर्सिटी धारवाड येथील पदव्युत्तर संस्कृत विभागातील निवृत्त प्रोफेसर व चेअरमन आहेत.

अत्यंत उत्साही व सकारात्मक वृत्ती बाळगणा–या त्यांनी जीवनातील प्रत्येक क्षण अत्यंत उत्साहाने व आनंदाने जगण्याचा स्वतःचा निश्चय उपस्थितांनाही करण्यास आग्रहाने प्रवृत्त केले. ते म्हणाले–इतरांच्या मानसिक गुलामगिरीत न राहता स्वतःला हवं तस जगा, स्वतःवर, स्वतःच्या मनावर इंद्रियांवर ताबा मिळवा 'तैलबिंदुरिवाम्भसि' या वाक्याप्रमाणे आज माणूस विभिन्न विषयांत गुरफटला आहे. पण माणसानी आपलं ध्येय आपल्या आनंदाचे विषय ठरवून त्यावर केंद्रित व्हायला हवे. नराचा नारायण होण्याकरिता योगाभ्यास कसा महत्वाचा आहे. हे त्यांनी उत्स्फूर्त बोलण्याने आणि अभिनयात्मक शैलीने उपस्थितांना पटवून दिले.

ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. अधिष्ठाता डॉ. नन्दा पुरी, विश्वविद्यालयाच्या नागपूर परिसर संचालिका आ.डॉ. कविता होले होते व कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. कलापिनी अगस्ती प्रामुख्याने उपस्थित होत्या. विश्वविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

डॉ. कलापिनी अगस्ती यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर डॉ. नन्दा पुरी यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे संचालन, डॉ. रेणुका करंदीकर ह्यांनी केले. कार्यक्रमाचे ऋणनिर्देश योगशिक्षिका सुजाता द्रव्यकार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता एकात्मता मंत्राने झाली.

योगसूत्र कार्यशाळा

दि. 10 जानेवारी 2019 ते 13 जानेवारी 2019 या कालावधीत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या व आर्यसमाज दयानंद भवन सदर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'पातञ्जल योगसूत्र अध्यापन वर्ग' ही कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत गुजरात प्रांतातील रोजड येथील दर्शनयोग महाविद्यालयाचे श्रद्धेय पूज्य स्वामी विवेकानंदजी यांनी मा. निदेशक योगसूत्रांचे अध्यापन केले. चार दिवस झालेल्या या कार्यशाळेत रोज पातंजल योगसूत्र या ग्रथांचा एक–एक पाद शिकविण्यात आला.

योगाचे आसन व प्राणायाम एवढेच स्वरूप नसून ते एक शास्त्र आहे, हा दृष्टिकोन जनमानसात रुजविणे हा या कार्यशाळे मागील महत्त्वाचा हेतू होता.

आर्यसमाज दयानंद भवन भवन मंगलवारी बाजार सदर येथे झालेल्या या कार्यशाळेच्या उद्घाघाटन प्रसंगी नागपूर येथील आर्य समाजाचे मंत्री मा. डॉ. धनलाल शेंद्रे, विश्वविद्यालयाचे विद्याथ्री तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी व शिक्षक आणि योगकेंद्र चालविणारे योगशिक्षक, आर्यसमाजाचे प्रतिनिधी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना प्रमाणपत्र व अन्य साहित्य निशुःल्क प्रदान करण्यात आले.

वल्लभाचार्य जयंती

भारतीय दर्शन विभागातर्फे 'आचार्यभारती' या उपक्रमांतर्गत दर्शनशास्त्रात महत्त्वपूर्ण योगदान केलेल्या आचार्यांच्या जयंतीच्या निमित्ताने विविध व्याख्यानांचे आयोजन केल्या जाते.

वल्लभाचार्य वेदान्त परंपरेतील प्रमुख आचार्यांपैकी एक शुद्ध द्वैत संप्रदायाचे ते प्रणेते होते. त्यांनी प्रतिपादिलेले सिद्धान्ततत्त्व जिज्ञासूंपर्यंत पोहोचविणे हा या व्याख्याना मागचा प्रमुख हेतू.

यावर्षी या उपक्रमांतर्गत विश्वविद्यालयाच्या भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'व्यास वाङ्मयपीयूषम्' अर्थात् दशदिनात्मक भागवताच्या कार्यक्रमाच्या समाप्तीच्या दिवशी व्याख्यान ठेवण्यात आले होते.

या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे सर्व मा. अधिष्ठाता, विभागप्रमुख तसे प्राध्यापक वर्ग आणि नागपुरातील भागवतार्थ जिज्ञासू वर्ग व विश्वविद्यालयाचे छात्र उपस्थित होते.

****

वेदांग ज्योतिष विभाग

स्थापना – वर्ष 2009

संकाय – प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्यशास्त्रे संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. वेदांग ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय

विभाग प्रमुख – डॉ. दिनकर मराठे, सहायक प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. प्रसाद गोखले

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 2

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय विज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचे तौलनिक अध्ययन करणे
- वेदांग ज्योतिष हे प्राचीन भारतीय शास्त्र म्हणून समाजात प्रस्थापित करणे.
- वेदांग ज्योतिष आणि वास्तुशास्त्राबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे.
- वैदिक साहित्यात दिसून येणा–या प्राचीन भारतीय विज्ञानाच्या बीजांचे सखोल संशोधन करणे
- संस्कृत साहित्याचे मानव्यशास्त्रासाठी असलेले योगदान विविध परिषदा, अध्ययन, सेमिनार या माध्यमातून प्रभावीपणे अधोरेखित करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

1 **आंतरविभागीय संशोधन**

वास्तु व आधुनिक स्थापत्यशास्त्र, सिद्धान्त ज्योतिष व आधुनिक खगोलविज्ञान, मेघ गर्भ लक्षण आणि आधुनिक पर्जन्य अंदाज, आधुनिक ज्योतिषशास्त्र व आयुर्वेद यांमधील आंतविभागीय संशोधनास चालना देणे.

2 **हस्तलिखितांचे संपादन**

- विभागाद्वारे प्राचीन हस्तलिखितांचा अभ्यास, संशोधन व संपादन करण्यास एम्. फिल्. व पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- 'जैमिनी सूत्रावरील हस्तलिखिताचे त्याच्या सर्व टीकांसहित पाठचिकित्सा व संपादन' या प्रकल्पाचे कार्य सुरू आहे.

वेदांग ज्योतिष विभाग

सप्तदिवसीय ग्रंथ पारायण कार्यशाळा – ग्रंथ – लघुपाराशरी

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेदांग ज्योतिष विभागामार्फत विद्यार्थी आणि शोधछात्रांसाठी लघुपाराशरी ग्रंथाचे सप्तदिवसीय पारायण कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या NIT परिसर नागपूर येते दिनांक १० ते १६ ऑगस्ट २०१८ या दरम्यान केले गेले. या उपक्रमात ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

आचार्य पराशरांचा हा लघुपाराशरी ग्रंथ हा वेदांग ज्योतिष शास्त्रातील अतिशय महत्वपूर्ण असा पुरातन ग्रंथ आहे. या पारायण दरम्यान प्रा. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, संकाय प्रमुख, भारतीय पुराविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय यांनी श्लोकांचा मथितार्थावर निरूपण केले. या पारायण सप्ताहात सहभागी विद्यार्थ्यांपैकी ६०: विद्यार्थ्यांनी लघुपाराशरी ग्रंथ कंठस्थ केला. डॉ.दिनकर मराठे, विभागप्रमुख, वेदांग ज्योतिष विभाग यांनी या पारायण सप्ताहाचे सुनियोजित पद्धतीने निर्देशन केले. विद्यापीठाच्या इतर विद्या विभागातील शिक्षकांनी आणि निर्देशकांनी देखील या पारायण सप्ताहात आपला सहभाग नोंदवला.

भास्कराचार्य व्याख्यानमाला (३ व्याख्याने) –

१. विशेष व्याख्यान – प्रो. अशोक थपलियाल, प्राध्यापक ,ज्योतिष विभाग, लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली

वर्ष २०१४–१५ पासून दरवर्षी वेदांग ज्योतिष विभागामार्फत भास्कराचार्य व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते सालाबादप्रमाणे या वर्षीही दिनांक 9.10.2018 रोजी सिद्धांतस्कंधावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. अशोक थपलियाल, वेदांग ज्योतिष विभाग, लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय हे या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. प्रा.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. सर्व विभागांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

२.विशेष व्याख्यान – डॉ. उपेंद्र भार्गव

या वर्षी दिनांक 10.10.2019 रोजी नैसर्गिक आपदा आणि ज्योतिष शास्त्र या विषयावर विशेष व्याख्यानाचे भास्कराचार्य व्याख्यानमालेअंतर्गत आयोजन केले गेले. या व्याख्यानासाठी डॉ. उपेंद्र भार्गव,महर्षी पाणिनी वेद एवं संस्कृत विश्वविद्यालय,उज्जैन हे वक्ते म्हणून लाभले. आचार्य वराहमिहीर यांच्या बृहद संहिता या ग्रंथाच्या विशेष संदर्भातून डॉ. भार्गव यांनी नैसर्गिक आपदा आणि ज्योतिष शास्त्र या विषयावर व्याख्यान दिले. प्रा.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. सर्व विभागांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

३. विशेष व्याख्यान – डॉ. रजनी जोशी

या वर्षी दिनांक 19.3.2019 रोजी संहितास्कंधावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या व्याख्यानासाठी बार्शी येथील प्रा.डॉ. रजनी जोशी या व्याख्याता म्हणून लाभल्या. भूगर्भातील पाण्याचा शोध कसा घ्यावा आणि तो कुठे घ्यावा? हे संहिता स्कंधातील दकार्गल विचारात अभ्यासले जाते. प्रा.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले.सर्व विभागांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

द्विदिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवाद –

वेदांग ज्योतिष विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक तसेच योगा संस्कृतम् युनिव्हर्सिटी,फ्लोरिडा यांच्या संयुक्त विद्यमाने या परिसंवादाचे आयोजन केले गेले

- **पार्श्वभूमी ज्योतिष आणि वास्तुशास्त्र, एक प्रत्यक्ष दृष्टिकोन**

  दिनांक : 8, 9 डिसेंबर 2018

ज्योतिष आणि वास्तुशास्त्र, एक प्रत्यक्ष दृष्टिकोन अशा द्विदिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन समाजासाठी,विद्यार्थ्यांसाठी, ज्योतिषानुरागिणीसाठी, शिक्षक आणि शोध छात्रांसाठी केले गेले.

या परिसंवादात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील वक्त्यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी बोलावले गेले. आमंत्रितांनी सहभाग्यांशी संवाद साधून अनेक विषयांवर चर्चा केली. शेवटच्या सत्रात शोध छात्रांनी आपले शोध निबंध सादर केले.

या आंतराष्ट्रीय परिसंवादाचे उदघाटन डॉ. पंकज चांदे,माजी अध्यक्ष, भारतीय विश्वविद्यालय संघ आणि माजी कुलगुरू, कविकुलगुरू कालिदास संस्कृत युनिव्हर्सिटी, रामटेक. प्रो. राजन वेळूकर, कुलगुरू, रायसोनी युनिव्हर्सिटी आणि माजी कुलगुरू, मुंबई युनिव्हर्सिटी यांच्या हस्ते झाले

विशेष अतिथी म्हणून प्रा. बीव्हीके शास्त्री, कुलगुरू योगा संस्कृतम् युनिव्हर्सिटी फ्लोरिडा, अमेरिका हे उपस्थित होते.

या वेळी प्रो. डॉ. देवीप्रसाद त्रिपाठी,लालबहादूर शास्त्री विद्यापीठ नवीदिल्ली यांनी प्रमुख भाषण केले. या आंतर राष्ट्रीय परिसंवादाचे उदघाटन सत्र मा. कुलगुरू श्री श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.दिनकर मराठे यांनी संचालित केले यावेळी व्यासपीठावर प्रो.डॉ. कृष्णकुमार पाण्डेय उपस्थित होते.

या द्विदिवसीय सोहळ्याचे समापन दिनांक ९.१२.२०१८ रोजी प्रो. डॉ. मधुसूदन पेन्ना,संकाय प्रमुख व निर्देशक,आंतरराष्ट्रीय संबंध आणि सहयोग विभाग,कविकुलगुरू कालिदास संस्कृत युनिव्हर्सिटी यांच्या निरोपपर भाषणाने झाले या सत्रात डॉ . विजयकुमार मेनन, संकाय प्रमुख व निर्देशक ठच्क कविकुलगुरू कालिदास संस्कृत युनिव्हर्सिटी, डॉ. अखिलेश मिश्रा, प्राध्यापक मद्रास संस्कृत महाविद्यालय आणि डॉ.कश्यप, संस्थापक स्कोप इन्स्टिट्युट बंगलोर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या द्विदिवसीय परिसंवादात देशाच्या विविध भागातून आलेले १२५ च्या वर मान्यवर उपस्थित होते.

- **उपस्थित मान्यवरांची नावे**

  १) प्रा.बीव्हीके शास्त्री,कुलगुरू योगा संस्कृतम् युनिव्हर्सिटी फ्लोरिडा ,अमेरिका

  २) प्रो. डॉ. देवीप्रसाद त्रिपाठी, लालबहादूर शास्त्री विद्यापीठ नवीदिल्ली

  ३) प्रो.विनय पाण्डेय,प्राध्यापक,बनारस हिंदू विश्वविद्यालय,वाराणसी

  ४) डॉ.अनिरुद्ध वझलवार, सुप्रसिद्ध ज्योतिषी,नागपूर

  ५) डॉ.कश्यप,संस्थापक स्कोप इन्स्टिट्युट बंगलोर

  ६) श्री.देवव्रत बूट, प्रसिद्ध ज्योतिषी,नागपूर

  ७) श्री. प्रसन्न मुजूमदार, त्रिस्कंध ज्योतिष महाविद्यालय,नागपूर

  ८) डॉ.उपेंद्र भार्गव, प्राध्यापक, महर्षी पाणिनी वेद एवं संस्कृत विश्वविद्यालय,उज्जैन

९) प्रा. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, संकाय प्रमुख, भारतीय पुराविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय, कविकुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक

१०) डॉ. अरुणकुमार उपाध्याय,सेवानिवृत्त IPS,भुवनेश्वर,ओडिसा

११) डॉ. अखिलेश मिश्रा, सहाय्यक प्राध्यापक,मद्रास संस्कृत महाविद्यालय,चेन्नई

१२) डॉ. डी.के. कुलकर्णी, प्राचार्य,त्रिस्कंध वेदांग महाविद्यालय,नागपूर

१३) डॉ.पद्मनाभ मराठे, प्राचार्य,श्री.दुर्गा PG रिसर्च सेंटर,कटील,मंगलोर

१४) डॉ. NVRA राजा, नाडी ज्योतिष विशेषज्ञ, हैदराबाद

१५) डॉ. प्रसाद गोखले, सहायक प्राध्यापक आणि समन्वयक MRC, KKSU,रामटेक

१६) डॉ. दिनकर मराठे, वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख, KKSU, रामटे

- **चर्चेचे विषय**

१) ज्योतिष आणि आरोग्य

२) ज्योतिष शास्त्र एक आजीविका निवडीचे साधन

३) द्वादश भावांचे उपयोजन

४) षोडश वर्गांची फलादेशात वैशिष्ट्ये

५) उपचारात्मक ज्योतिष

६) ज्योतिष आणि योग यांमधील संबंध

७) प्रश्नाच्या दृष्टिकोनातून अष्टमंगलाचा संबंध

८) प्राचीन वास्तुशास्त्राच्या ग्रंथांतील स्मार्ट शहराचे नियोजन आणि बांधकामाच्या संकल्पना

९) कृष्णमूर्ती पद्धतीने फलादेश

१०) वराहमिहीराच्या बृहदसंहितेच्या विशेष संदर्भातून संहिता स्कंधाचा संबंध (पाऊसाचे फलकथन आणि भूगर्भजलाचे परीक्षण – दकार्गल इत्यादी)

११) ज्योतिष शास्त्राद्वारे वैवाहिक समुपदेशन

१२) अष्टकुटांची वैशिष्ट्ये आणि त्यांचे उपयोजन

- **परिसंवादाचे निर्देशक –**

प्रा. कृष्णकुमार पाण्डेय, संकाय प्रमुख, भारतीय पुराविद्या शाखा आणि मानव्य शास्त्र संकाय

- **समन्वयक**

१)डॉ. दिनकर मराठे,सहायक प्राध्यापक,वेदांग ज्योतिष विभाग

२)डॉ. प्रसाद गोखले,सहायक प्राध्यापक,वेदांग ज्योतिष विभाग

ज्योतिष परामर्श केंद्र

यावेळी सामान्य नागरिकांसाठी विद्यापीठातर्फे ज्योतिष परामर्श केंद्राचे उदघाटन झाले.

माजी कुलगुरू डॉ.पंकज चांदे,माजी अध्यक्ष AIU आणि माजी कुलगुरू ककासंवि रामटेक यांच्या हस्ते दिनांक ६डिसेंबर २०१८ रोजी ज्योतिष परामर्श केंद्राचे उदघाटन झाले. समाजात ज्योतिष शास्त्राविषयीच्या चुकीच्या धरणांचे निर्मूलन करून समाजाला मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने या परामर्श केंद्राची मुहूर्त मेढ रोवण्यात आली. याप्रसंगी प्रा. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय,प्रमुख, भारतीय पुराविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय,कविकुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक आणि डॉ. दिनकर मराठे,वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख, KKSU,रामटेक हे उपस्थित होते.

सामंजस्य करार –

दिनांक 9.12.2018 रोजी कविकुलगुरकालिदास संस्कृत विश्वविद्यालय आणि स्कोप इन्स्टिटयूट बंगलोर यांच्या मध्ये सामंजस्य करार झाला. हा करार प्रामुख्याने विद्यार्थी आणि शोध छात्रांच्या लाभाकरिता शैक्षणिक देवाणघेवाणीसाठी करण्यात आला.

स्कोप संस्थे तर्फे डॉ.कश्यप आणि वेदांग ज्योतिष विभागातर्फे विभाग प्रमुख डॉ.दिनकर मराठे, यांनी हा करार साक्षांकित केला. सामंजस्य करार हस्तांतरणाची वेळी प्रा. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय,प्रमुख, भारतीय पुराविद्या आणि मानव्य शास्त्र संकाय, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक, डॉ. विजयकुमार मेनन,निर्देशक,नियोजन आणि विकास मंडळ, डॉ. प्रसाद गोखले,सहायक प्राध्यापक आणि समन्वयक MRC, KKSU,रामटेक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी वास्तुपरीक्षण आणि प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन
स्थळ : जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ रामनगर नागपूर
दि. 9.3.2018

वेदांगज्योतिष विभागातर्फे वास्तुविद्या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक आणि वास्तू परीक्षणसत्राचे आयोजन करण्यात आले. वास्तुशास्त्रातील सिद्धांत भूमी आणि बांधकामात कसे उपयोजित केले जातात,मृदा परीक्षण,बांधकाम कसे केले जाते ? हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखवणे हा या प्रात्यक्षिक सत्रामागचा उद्देश होता. यावेळी वास्तुशास्त्रातील सिद्धांत,दिक् साधन यांविषयी डॉ. कृष्णकुमार पांडे यांनी निरूपण केले. सर्व विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकच अहवाल सादर केला. एकूण ५० विद्यार्थी या प्रात्यक्षिकास हजर होते. वेदांग ज्योतिष विभागाने श्री.जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाचे दिलेल्या संधीसाठी आभार व्यक्त केले.

विभागात सुरू असलेले अभ्यासक्रम

- वेदांग ज्योतिष
- वेदांग ज्योतिष
- वेदांग ज्योतिष
- पदव्युत्तर पदविका वेदांग ज्योतिष
- वास्तुशास्त्र पदविका

नवीन अभ्यासक्रमास प्रारंभ

सम्मानित शास्त्री वेदांग ज्योतिष हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०१८–१९ पासून श्री गोळवलकर गुरुजी गुरुकुल,रामटेक परिसर येथे सुरू झालेला आहे

विद्यार्थ्यांचे यश

श्री. प्रणव मुळे यांना वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रमात शैक्षणिक वर्ष २०१७–१८,प्रथम क्रमांक प्राप्त झाला. रामटेक येथे झालेल्या ८ व्या दीक्षांत समारोहात विद्यापीठातर्फे सुवर्ण पदक देण्यात आले.

सौ. कल्याणी डहाळे यांना वेदांग ज्योतिष अभ्यासक्रमात शैक्षणिक वर्ष २०१७–१८,प्रथम क्रमांक प्राप्त झाला. रामटेक येथे झालेल्या ८ व्या दीक्षांत समारोहात विद्यापीठातर्फे सुवर्ण पदक देण्यात आले.

श्री. अनुज शर्मा वेदांग ज्योतिष यांनी राज्यस्तरीय संस्कृत शास्त्र वक्तृत्व स्पर्धेत सक्रिय सहभाग घेतला आणि संस्कृत शलाका परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला हि स्पर्धा राष्ट्रीय संस्कृत संस्थान मुंबई ,परिसर मुंबई येते डिसेंबर २०१८ मध्ये आयोजित करण्यात आली होती

श्री. अनुज शर्मा वेदांग ज्योतिष यांनी शास्त्रार्थ परीक्षा वर्गात सहभाग नोंदवला याचे आयोजन राष्ट्रीय संस्कृत संस्थान,तिरुपती येथे जून २०१९ मध्ये याचे आयोजन करण्यात आले होते.

श्री.कौशल जोशी, वेदांग ज्योतिष यांनी राष्ट्रीय संस्कृत संस्थान,तिरुपती येथे जुन २०१९ मध्ये आयोजित विद्यापीठ स्तरीय अखिलभारतीय संस्कृत छात्र प्रतिभा महोत्सवात सहभाग घेतला.

श्री.अनुज शर्मा, वेदांग ज्योतिष यांनी राष्ट्रीय संस्कृत संस्थान,तिरुपती येथे जुन २०१९ मध्ये आयोजित विद्यापीठ स्तरीय अखिलभारतीय संस्कृत छात्र प्रतिभा महोत्सवात सहभाग घेतला.

***

शिक्षणशास्त्र विभाग

स्थापना – वर्ष 2008

संकाय – शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय

अभ्यासक्रम – एम्. एड्., एम्. फिल्., पीएच्.डी. शिक्षणशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. ललिता चंद्रात्रे

विभाग प्रमुख – डॉ. कीर्ती सदार, सहयोगी प्राध्यापिका

सहायक प्राध्यापक– डॉ. हृषिकेश दलाई, डॉ. अमोल मांडेकर, डॉ. राजश्री मेश्राम, प्रा. अनघा आंबेकर

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 3

उद्दिष्टे –

- संस्कृत शिक्षकांची तथा इतर शिक्षकांची निर्मिती करणे
- प्राचीन भारतीय शिक्षण संकल्पना आणि आधुनिक शिक्षण पद्धती आणि विचारांचे अध्ययन– अध्यापन आणि संशोधन करणे.
- संस्कृत शिक्षण पद्धती आधुनिक काळाशी सुसंगतरित्या विकसित करणे.
- जागतिक स्तरावरील शिक्षण विचारांचा आणि सिद्धांताचा अद्ययावत अभ्यास करून अभ्यासक्रमाची रचना करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- मार्गदर्शकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे.
- विविध परिषदा, सेमिनार, कार्यशाळा यामध्ये विद्यार्थी, संशोधक छात्र आणि प्राध्यापकांचा सहभाग

शिक्षणशास्त्र विभाग

पद्व्युत्तर शिक्षणशास्त्र विभागामध्ये पुढील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- दिनांक 29 सप्टेंबर 2018 रोजी सकाळी 11 ते सायं 5 पर्यंत एम.एड. च्या सर्व विद्यार्थ्यांकरिता इंटर्नशीप ओरिएन्टेशन प्रोग्राम घेण्यात आला. यामध्ये प्राध्यापकांनी इंटर्नशीप ॲक्टिव्हीटीज बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये महाविद्यालयीन परिपाठ, पाठनियोजन, पाठनिरीक्षण, घटक चाचणीचे नियोजन,

आयोजन व मूल्यमापन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांना लाभ झाला.

- **राज्यस्तरीय संशोधन चर्चासत्र**

दिनांक 05.12.2018 रोजी पद्व्युत्तर शिक्षण विभागातर्फे एकदिवसीय राज्यस्तरीय संशोधन आधारीत चर्चासंपन्न झाले. (One day State Level Research Seminar) या चर्चासत्राचे उद्घाटनाला प्रमुख अतिथी म्हणून रामटेक येथील डी.वाय.एस.पी. मा. नयना आलुरकर उपस्थित होत्या. तसेच प्रमुख वक्ते डॉ. गजानन गुल्हाने विभागप्रमुख, शिक्षणशास्त्रा विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व डॉ. रमाकांत कपले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे उपस्थित होते. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरु प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. ललिता चंद्रात्रे यांनी केले. आभार प्रदर्शन विभागप्रमुख डॉ. कीर्ती सदार यांनी केले. उद्घाटन सभारंभानंतर संशोधनावर आधारीत दोन शैक्षणिक सत्रा संपन्न झाले. प्रथम सत्रात प्रमुख वक्ते मा. गजानन गुल्हाने, विभागप्रमुख संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे होते. त्यांनी Research Training या विषयावर पीपीटीद्वारे उद्बोधन केले. त्यानंतर चर्चा झाली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. द्वितीय सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. रमाकांत कपले, एस. आर. टी. एम. युनिर्व्हसिटी नांदेड हे होते. त्यांनी पीपीटी सादरीकरण करुन Nack of Researching या विषयावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी विश्वविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे व कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी उपस्थित होते. आभार डॉ. अमोल मांडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन निलिमा रिंधे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम व्यवस्थितरित्या पार पडला.

- दिनांक 23 फेब्रुवारी 2019 रोजी 'शैक्षणिक संख्याशास्त्र' या विषयावर प्रा. कविता गोमासे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संशोधन विषयानुसार व उद्दिष्टांनुसार कोणत्या सांख्यिकीचा उपयोग करावा याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या व्याख्यानाचा लाभ विद्यार्थी व संशोधक यांना झाला.

- दिनांक 30 मार्च 2019 रोजी शैक्षणिक संशोधन पद्धती या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. वक्ता म्हणून डॉ. सीमा इंदुरकर, प्रभारी प्राचार्या नरगुंदकर बी.एड. महाविद्यालय,नागपूर यांनी मार्गदर्शन केले. अतिथी व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर चर्चा संपन्न झाली. या व्याख्यानाला एम.एड., एम. फील. व पीएच.डी चे विद्यार्थी व संशोधक उपस्थित होते.

वार्षिक अहवाल
मराठी

प्रकरण दूसरे
विस्तार सेवा अहवाल

विस्तार सेवा कार्य

राष्ट्रीय सेवा योजना

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक सेवेद्वारे सामाजिक सेवेमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत.

योग दिवस 21–06–2018 – कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या योग विभागाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय योग दिनी योग प्रात्यक्षिक सत्र आयोजित केले. सत्रामध्ये सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. त्या सत्रात प्राणायाम, ध्यान आणि काही योगासने शिकविली.

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन आणि गांधी जयंती 1.10.2018 – विद्यापीठाच्या रासेयो पथकाने दि. 02–10–2018 रोजी आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन आणि गांधी जयंती साजरी केली. रामटेक येथे पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. नागपूरच्या एनआयटी परिसरात कविगॉस्टियन अहिमा यांचे आयोजन करण्यात आले होते.

संविधान दिन 26.11.2018 – संविधान दिन 24–11–2018 रोजी साजरा करण्यात आला. या संदर्भात एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व कर्मचारी आणि 50 स्वयंसेवक सहभागी झाले होते.

युवा दिन (विवेकानंद जयंती) 12–01–2019 – राष्ट्राचे भविष्य घडविण्यासाठी देशातील तरूणांना खूप महत्त्व आहे म्हणून तरुण पिढीचा शैक्षणिक विकास तितकाच महत्त्वाचा आहे. या विचारांच्या संदर्भात, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने 12.01.2019 रोजी युवा दिवसाचे आयोजन केले आहे.

वृक्षारोपण मोहीम – विद्यापीठाच्या एनएसएस पथकाने विद्यापीठ परिसराच्या सभोवती आणि परिसरात सुमारे 100 हून अधिक रोपे लावली आहेत. आम्ही वेगवेगळ्या प्रसंगी जून ते ऑगस्ट पर्यंत ही रोपे लावली आहेत.

****

हस्तलिखित संसाधन केंद्र, रामटेक

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक हे २००४ पासून राष्ट्रीय हस्तलिखित मिशन नवी दिल्ली चे राष्ट्रीय हस्तलिखित संसाधन केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. MRC भारताच्या हस्तलिखित वारशाची महत्त्वपूर्ण माहिती शोधण्यात, दस्तऐवजीकरण करण्यास, संरक्षणास आणि सुलभ करण्यासाठी एक समग्र दृष्टीकोन विकसित करण्याचा प्रयत्न करते. केंद्राची उद्दिष्टे सर्वेक्षण, डेटा संग्रहण, कागदपत्रे जतन करणे आहे. आजतागायत महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा भागासह एकूण १६५२८ हस्तलिखिते केंद्राकडे नोंदविली आहेत. तसेच हस्तलिखित जागृती मोहीम अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले.

२८–०९–२०१५ रोजी कविकुलगुरू कलिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक आणि राष्ट्रीय हस्तलिखित मिशन, नवी दिल्ली यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला आहे. राष्ट्रीय हस्तलिखित मिशन, नवी दिल्ली यांनी 2015 मध्ये MRC रामटेक यांना प्रथम हप्ता म्हणून ४.५ लाख रुपये सुपूर्द केले आहेत.

जानेवारी २०१८ मध्ये कविकुलगुरू कलिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक आणि राष्ट्रीय हस्तलिखित मिशन दिल्ली यांच्यात झालेल्या सामूहिक सामंजस्य कराराचे जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०२० पर्यंत नूतनीकरण करण्यात आले.

विश्वविद्यालयाच्या हस्तलिखित केंद्राची जबाबदारी महाराष्ट्र राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा भागातील हस्तलिखितांची देखरेख आणि दस्तऐवजीकरण आणि सर्व हस्तलिखितांशी संबंधित क्रिया जसे की सर्वेक्षण (हस्तलिखित जिथे उपलब्ध आहेत अशा संस्थागत तसेच खाजगी हस्तलिखितांचे संग्रहण) याप्रमाणे आहे.

जनजागृती चळवळ

व्याख्यानमाला – केंद्राने हस्तलिखितांचे जन जागृती कार्यक्रम, पुरातन भारतातील लेखन आणि लेखन साहित्याचा इतिहास, लोअर टीका, हस्तलिखितांचे संवर्धन आणि जतन, हस्तलिखितांचे महत्त्व, सचित्र विवरण अशा विविध विषयांवर 2018–19 दरम्यान हस्तलिखितांवर हस्तलिखितांची व्याख्याने आयोजित केली आहेत. हस्तलिखिते, हस्तलिखितांचे दस्तऐवजीकरण इ. कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात येते.

शारदा लिपी कार्यशाळा – शारदा लिपीवर एमआरसीने राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित केली.

छात्र कल्याण विभाग

छात्र कल्याण विभागाद्वारे आयोजित कार्यक्रम व स्पर्धांचे विवरण पुढीलप्रमाणे –

1) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार –

दरवर्षी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी सर्व शैक्षणिक विभागातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. प्रत्येक पदव्युत्तर स्तरावरील विशेषाध्ययन विषयामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा–या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येतात. वर्ष 2018–19 या शैक्षणिक वर्षात 18–09–2018 रोजी विश्वविद्यालयाच्या स्थापना दिनी हे पुरस्कार निम्नलिखित विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यास रोख रू. 2000 आणि प्रमाणपत्र असे पुरस्कार देण्यात आले.

1. वेद विशेषाध्ययन – महर्षी वेदव्यास पुरस्कार– श्रेयस कु–हेकर
2. व्याकरण विशेषाध्ययन – महर्षी पाणिनी पुरस्कार – तृप्ति लांजूडकर
3. साहित्य विशेषाध्ययन –नाट्याचार्य भरतमुनी पुरस्कार – सायली पेशवे
4. दर्शन विशेषाध्ययन– – सर्वदर्शन पुरस्कार – कल्पना चांदूरकर
5. योग विशेषाध्ययन – महर्षी पतंजलि पुरस्कार – सुनीता वाधावन
6. वेदांग ज्योतिष विशेषाध्ययन – होरामर्मज्ञ वराहमिहिर पुरस्कार – श्रीगौरी घाटाटे
7. शिक्षणशास्त्र विभाग – –भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार– वैशाली चिडे

2) **विशेष व्याख्यान –** कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शास्त्री व प्राक्शास्त्रीच्या विद्यार्थ्यांकरिता दि. 31.07.2018 रोजी एक विशेष व्याख्यान ठेवण्यात आले.

पॉडेचेरीच्या श्री अरविंदो सोसायटीच्या सदस्य इंद्राणी घोष यांनी जीवनाचा उद्देश या विषयावर प्रेरक व्याख्यान दिले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

3) **गुरुपौर्णिमा –** कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरामध्ये दिनांक २७ जुलै २०१८ रोजी गुरूपौर्णिमे निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भारतीय धर्म व संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता डॉ. विजयकुमार, त्याचप्रमाणे शिक्षाशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. ललिता चंद्रात्रे व विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसराचे संचालक डॉ. हृषीकेश दलाई तसेच विश्वविद्यालयाच्या विविध विभागातील प्राध्यापकवृंदांचा सत्कार विश्वविद्यालयातील प्राकशास्त्री व शास्त्री वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात आला. जगदगुरू श्री. शंकराचार्य यांना वंदन व सर्व गुरूंचे वंदन करण्यासाठी श्री. शंकराचार्य भगवत्पाद रचित गुर्वष्टकस्तोत्राचे गायन विद्यार्थ्यांनी केले.

त्यानंतर भारतीय धर्म व संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी भारतीय परंपरेमध्ये गुरू व त्यांचे महत्त्व, आजच्या काळातील गुरु परंपरेची प्रासंगिकता यांवर विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. त्याचबरोबर वेद विद्या संकायाचे अधिष्ठाता डॉ. विजयकुमार महोदय यांनी आजच्या काळामधे संस्कृत भाषेचे महत्त्व व विश्वविद्यालयपरिसरामध्ये संस्कृत भाषेसाठी वातावरण निर्मिती यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

4) **इन्द्रधनुष्य – 2018 –19 निवडफेरी**

राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव इन्द्रधनुष्य–2018 यंदा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे 07 ते 11 डिसेंबर 2018 ला आयेजित करण्यात आला होता . त्यासाठी विद्यापीठस्तरीय निवडफेरीचे आयोजन 24 ऑक्टोंबर 2018 ला कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक परिसर येथे करण्यात

आले होते. या वर्षी प्रथमच इन्द्रधनुष्य निवडफेरीचे आयोजन विश्वविद्यालयाच्या मुख्य परिसर रामटेक येथे घेण्यात आले.

इन्द्रधनुष्य निवडफेरी मध्ये विविध 14 स्पर्धांमध्ये (वाद–विवाद, वक्तृत्व, प्रहसन, एकांकिका, भारतिय वाद्य संगीत, प्रश्नमुजूषा, सुगम संगीत, मूकनाट्य, स्थल छायाचित्रण, ललित कला, चिकटकला, पोस्टर मेकिंग, मातीकला व रांगोळी) एकूण 06 महाविद्यालयातील 124 विद्यार्थ्यांनी उत्स्फूंतपणे सहभाग घेतला. इन्द्रधनुष्य निवडफेरी–2018 या कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या अध्यक्षतेत झाले मा. अध्यक्षांनी सर्व महाविद्यालयातील संघप्रमुखांचे पुष्प–गुच्छ देवून स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक छात्र कल्याण डॉ. जयवन्त चौधरी व सूत्र संचालक प्रा. पल्लवी कावळे यांनी केले.

5) **निबंध स्पर्धा**

गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांसाठी २७ जुलै २०१८ रोजी निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'मानवी जीवनामध्ये गुरूचे महत्त्व' या विषयावर मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषांमध्ये निबंध प्रस्तुत करण्यात आले. या स्पर्धेत बी.ए. संस्कृत विशारद वर्गाची विद्यार्थिनी श्रुती शर्मा हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याचप्रमाणे शास्त्री प्रथम वर्षाची विद्यार्थिनी प्रियंका बागडे हिने द्वितीय तसेच शास्त्री प्रथम वर्षातील दोन विद्यार्थी कोमल गराडे व आकाश पाटील यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केले.

निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार विश्वविद्यालयाच्या वरिष्ठ शिक्षकांद्वारे तसेच विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसराचे संचालक डॉ. हृषिकेश दलाई यांच्या कडून करण्यात आला. त्याचप्रमाणे स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांचे प्रमाणपत्र वितरणाने शिक्षकांकडून कौतुक करण्यात आले.

6) लघु नाटिका (पथ नाट्य)

संपूर्ण भारतात सार्वजनिक निवडणूक–2019 मोठ्या उत्साहात पार पडली. या निमित्ताने रामटेक क्षेत्रात मतदानविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. सामान्य व विशेष दोन्ही प्रकारच्या लोकांनी या निवडणुकांमध्ये आपला मतदानाचा हक्क बजवावा, या हेतूने ही मोहिम राबविण्यात आली.

रामटेक क्षेत्रात 12.04.2019 रोजी निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीमध्ये प्रत्येकाने आपले मतदान केले पाहिजे या हेतुने दि. 03.04.2019 रोजी विश्वविद्यालयाच्या शैक्षिक भवनात एक लघु नाटकाचे सादरीकरण झाले. या नाट्याचा विषय होता, 'मतदान हाच आपला हक्क खरा' या नाटकाच्या सादरीकरणावेळी विश्वविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी उपस्थित होते. ममताताई बनसोड, अनुपमा बिसने, निकिता कावरे, दीक्षा ठाकरे, अर्चना वाडीभस्मे, संघमिश्रा मेश्राम या कलाकारांनी सादर केलेल्या या लघुनाटिकेचे लेखन डॉ. अंशुजाताई किंमतकर, दिग्दर्शन योगिता गायकवाड यांनी केले तर वाद्यसाथ प्रशांत जांभुळकर यांनी केली.

7) **संक्रमणोत्सव 2018–19**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागातर्फे आयोजित संक्रमणोत्सव गुरुवार, दि. 17 जानेवारी 2019 रोजी रामटेक येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी होते तर उद्घाटक म्हणून रामटेकचे आमदार श्री मल्लिकार्जुन रेड्डी उपस्थित होते. प्रमुख अतिथी या नात्याने श्री. जोगेन्द्र कटयारे, उपविभागीय अधिकारी, रामटेक उपस्थित होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, विद्यापीठाचे सर्व अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, डॉ. मधुसूदन पेन्ना, डॉ. विजयकुमार, डॉ. ललिता चंद्रात्रे, डॉ. कृष्णकुमार पांडेय व संक्रमणोत्सवाचे समन्वयक व छात्र कल्याण संचालक डॉ. जयवंत चौधरी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. याप्रसंगी विविध विभागांच्या विद्यार्थ्याद्वारे तयार करण्यात आलेल्या हस्तलिखितांचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. संक्रमणोत्सवानिमित्ताने वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, स्वरचित कवितावाचन,

मेहंदी, रांगोळी, सलाद डेकोरेशन, पुष्परचना, अन्त्याक्षरी, फॅन्सी ड्रेस, विविध क्रीडा स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धामधील विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांद्वारे याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आले. विश्वविद्यालयाच्या विद्यार्थिनी भामा व भावना मेनन यांनी मोहिनीअट्टम व तृप्ती व तृष्णा लांजूळकर यांनी भरतनाट्यम् चा सुंदर नृत्याविष्कार सादर केला. कार्यक्रमाचे संचालन श्रीवरदा माळगे यांनी केले तर प्रा. पल्लवी कावळे यांनी आभार मानले. श्री. श्रीपाद अभ्यंकर यांनी गायिलेल्या वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

8) **विद्यार्थी प्रेरणा कार्यक्रम**

सन 2018–19 या शैक्षणिक सत्राकरिता नवीन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा कार्यक्रमाची सुरुवात मोठ्या उत्साहाने आनंदाने करण्यात आली . वीस दिवसांचा इंडक्शन प्रोग्राम विशेषतः हा विद्यार्थ्यांसाठी बनविला गेला होता ज्यात प्रामुख्याने संस्कृतची ओळख, भाषेतील विविध प्रवाहांचा परिचय इत्यादींवर लक्ष केंद्रित केले गेले होते. हा नवीन उपक्रम प्राक्शास्त्री, शास्त्री व आचार्याच्या विद्यार्थ्यांसाठी होता. विद्यार्थ्यांसाठी शिस्तबद्ध दिनचर्या होती. नवीन विद्यार्थ्यांसाठी स्पोकन संस्कृत वर्ग आयोजित करण्यात आला होता. यामुळे त्यांना संस्कृत शिकण्यास आणि भाषेबद्दल आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. वैष्णवी आणि दिव्यानी, या विभागातील दोन विद्यार्थ्यांनी येथे सरल संस्कृत शिकवले. विद्यार्थ्यांना भाषा शिकण्यास मदत करण्यासाठी त्यांनी साध्या संस्कृ तमध्ये संवाद साधला. याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांनी 'उमा–हैमवती कथा' या नावाने एक लहान संस्कृत नाटक सादर केले. हा महिन्याच्या पहिला दिवस होता. त्या निमित्त विद्यार्थ्यांनी मेघदूतम या कालिदासाच्या महाकाव्याची काही श्लोक वाचली. संस्कृत सह, इंग्रजी भाषा देखील या प्रेरण कार्यक्रमाचा एक भाग होती. प्रा. अनघा आंबेकर यांनी कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना सरल इंग्रजी भाषेचे ज्ञान दिले .

संस्कृतमधील विविध प्रवाहांचा परिचय, संस्कृत शास्त्रांचा परिचय, संस्कृत भाषेचा परिचय, सामाजिक जीवनातील आपले कर्तव्य, विद्यापीठाची ओळख, विविष विभागांची ओळख , इतर राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना रामटेक नागरीची ओळख या प्रेरण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. व्याकरण विभागातील डॉ. हरेकृष्ण अगस्ती व डॉ. श्री. शिवराम भट्ट, दर्शन विभागाच्या डॉ. कलापिनी अगस्ती, संस्कृत साहित्य विभागाचे डॉ. पराग जोशी आणि ज्योतिष विभागाचे डॉ. दिनकर मराठे यांनी आपापल्या विभागाची माहिती दिली व विद्यार्थ्यांना त्यांचे निवडक विषय निवडण्यास मदत केली. विद्यार्थ्यांना भाषेत नवीन विषयांची ओळख करुन दिली गेली.

इंडक्शन प्रोग्राममध्ये केवळ घरातील किंवा वर्गातील क्रियाकलापांवरच लक्ष केंद्रित केले असे नाही तर त्यामध्ये काही मैदानी आणि परस्परसंवादी सत्रे देखील होती. विद्यार्थी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यात संवादसत्र देखील होते . परिसरामध्ये विद्यापीठाचा दौरा, विभागीय ग्रंथालयदर्शन व यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. श्री. मिश्रा सरांनी डिजिटल जगाविषयी आणि संगणकांविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांना भेट दिली आणि विद्यापीठाच्या विविध अंगांबद्दल त्यांना माहिती देण्यात आली. अधिकारी आणि विद्यार्थी यांच्यात बंध आणखी मजबूत करण्याचा विद्यार्थ्यांना पूर्णपणे नवीन अनुभव देण्यात आला . श्री. कळंबे यांनी संघातील भावना, क्रीडा आणि फिटनेसचे महत्त्व याबद्दल सांगितले. श्री. कठाळे यांनी त्यांच्याशी संबंध आणि मैत्री यावर चर्चा केली. डॉ. दलाई यांनी पर्यावरणाच्या मुद्द्यांवर भाषण केले, प्रा. चन्द्रात्रे या मनाच्या आत्मविश्वासाबद्दल बोलल्या . डॉ. बोकारे यांनी संस्कृत भाषेद्वारे व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनावर चर्चा केली. डॉ. विजयकुमार यांनी संस्कृत संभाषणावर मार्गदर्शन केले. डॉ. जयवंत चौधरी यांनी वसतिगृहातील जीवन, परिसराची स्वच्छता, पाणी आणि ऊर्जा संवर्धनाबाबत एक सत्र आयोजित केले.

या 20 दिवसाच्या प्रेरणा कार्यक्रमादरम्यान काही विशेष कार्यक्रम आयोजित केले गेले होते. रामटेक येथील प्रसिद्ध राम मंदिराला भेट दिली . विद्यार्थ्यांना शहराच्या ऐतिहासिक महत्त्वाविषयी जागरुक केले. कलिदासदिनाच्या निमित्ताने ''कालिदास स्मारक" यथे भेट देण्यात आली. . तेथे मेघदूतमच्या श्लोकांनी रचलेली संगमरमर वरची रचना पाहिली. या निमित्ताने प्रा. नंदा पुरी यांनी मेघदूत व त्याच्या विविध बाबींवर व्याख्यान

दिले. मुंबईतील पाहुणे श्री. गंधार कुलकर्णी हे रामटेकहून सायकलनी प्रवास करणार होते . कवी कालिदासानी सांगितलेल्या मेघमार्गाने ते प्रवास करणार होते. विद्यापीठाने हिरवा झेंडा दाखवून त्यांच्या प्रवासाची सुरुवात केली. एन.एस.एस. च्या चमूद्वारे परिसरात सफाई अभियान देखील आयोजित केले गेले. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांसाठी सायकल सुविधेचे उद्घाटन देखील करण्यात आले.

9) **विशेष व्याख्यान**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे दिनांक 30–08–2019 रोजी दुपारी 02.30 वाजता सर्व विद्यार्थ्यांकरिता नांदेड विद्यापीठाच्या मराठी विभाचे निवृत्त प्राध्यापक श्री. दत्ता भगत यांचे एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले . श्री. दत्ता भगत यांच्या व्याख्यानाचा विषय होता "मराठी नाटक व संस्कृत रंगभूमी''. कार्यक्रमाला विश्वविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन संचालक छात्र कल्याण डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

10) **गणपती उत्सव**

विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे 2 सप्टेंबर 2018 सोमवार रोजी विश्वविद्यालयाच्या प्रज्ञाचक्षु श्री. गुलाबराव महाराज योग भवन येथे गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. विविध स्पर्धा, नवीन सजावट, मखर, नवनव्या कल्पना यांनी विनटलेला या गणेशोत्सवात सर्वजण आनंदाने सहभागी झाले होते. या संपूर्ण गणेश उत्सवामध्ये कुठेही प्लास्टिकचा वापर करण्यात आला नहव्ता . पूर्ण 10 दिवस हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

11) **विशेष व्याख्यान**

जगातील सर्वात प्राचीन भाषांपैकी एक संस्कृत भाषा प्राचीन सनातनी ज्ञान विज्ञान परंपरेचा खोल समुद्र आहे. संस्कृतशिवाय भारताची कल्पनाही करता येणार नाही. आधुनिक ज्ञान–विज्ञानातील अनेक स्त्रोतांचे बीज वैदिक आणि संस्कृत साहित्यात आढळतात. त्यांची माहिती व्हावी म्हणून दि. 05–08.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागातर्फे संस्कृत भारतीचे प्रमुख श्री. दिनेश जी कामत यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला वेदविद्या संकाय प्रमुख प्रोफेसर सी.जी. विजय कुमार हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. संचालक छात्र कल्याण डॉ. जयवंत चौधरी यांनी श्री. कामत यांचा परिचय करून दिला . श्री. कामत यांनी आपल्या व्याख्यानात संस्कृतचे महत्व व आपण करायचे उपाय या वर प्रकाश टाकला . या कार्यक्रमाला दर्शन संकाय प्रमुख प्रोफेसर मधुसूदन पेन्ना सुद्धा उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन संचालक छात्र कल्याण डॉ. जयवंत चौधरी यांनी मानले.

12) **विवेकानंद जयंती**

स्वामी विवेकानंद हे सुप्रसिद्ध अवतारवरिष्ठ रामकृष्ण परमहंस यांचे मुख्य शिष्य होय. १२ जानेवारी हा दिवस संपूर्ण भारतात विवेकानंद जयंती म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने विद्यापीठाच्या प्रार्थनासभेत स्वामी विवेकानंद यांच्या प्रसिद्ध भाषणाचे पठण करण्यात आले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयातील साहित्य विभागाचे प्राध्यापक डॉ. पराग जोशी व प्राध्यापिका पल्लवी कावळे व संचालक छात्र कल्याण डॉ. जयवंत चौधरी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

13) **गांधी जयंती (स्वच्छता शपथ)**

01–11–2018 रोजी सकाळी 11.00 वाजता विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे गांधी जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे माननीय कुलगुरू श्रीनिवास वरखेडी जी वेदविद्या संकाय प्रमुख सी.जी. विजय कुमार विश्वविद्यालयाचे माननीय कुलसचिव श्री अरविन्द जोशी व प्रमुख पाहुणे उपस्थित होते. माननीय कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी आपल्या व्याख्यानात म्हटले की सत्य अन्वेषक

म्हणून, गांधीजींनी खूप शांत जीवनशैली स्वीकारली आणि स्वच्छतेची प्राथमिकता उपलब्ध करुन दिली. ते म्हणाले की गांधीजींनी अनुभवले की स्वच्छता देशासाठी अपरिहार्य आहे म्हणूनच "स्वच्छता हाच देव आहे ". महात्मा गांधींच्या मार्गदर्शनात भारत स्वतंत्र झाला पण भारताचे स्वच्छतेचे स्पप्न अजूनही पूर्ण झाले नाही. म्हणूनच, स्वच्छता आणि आरोग्यविषयक माहिती जाणून घ्या. या नंतर स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक , सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

14) **महाराष्ट्र प्रांतीय संस्कृत शास्त्रीय वाक् स्पर्धा, मुंबई निवड फेरी**

प्रत्येक वर्षी राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या के. जे. सोमय्या संस्कृत विद्यापीठाद्वारे महाराष्ट्र राज्यस्तरीय शास्त्र स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेमध्ये विद्यापीठही दरवर्षी सहभागी होतो . या स्पर्धेच्या तैयारी करिता व जार्णाया विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता 01–09–2018 रोजी छात्र कल्याण विभागाद्वारे निवडफेरीचे आयोजन करण्यात आले.

या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये व्याकरणशलाका, वेदान्तशलाका, सांख्ययोगभाषण, धातुरूपकण्ठपाठ, ज्योतिषशलाका, पुराणेतिहासशलाका, साहित्यशलाका, शास्त्रीयस्फूर्ति, वेदभाष्यभाषण, साहित्यभाषण, धर्मशास्त्रभाषण, अष्टाध्यायीकण्ठपाठ, भगवद्गीताकण्ठपाठ इ. विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. भारताच्या विकासात प्राचीन शास्त्रपरंपरेचे अन्यन्यसाधारण स्थान आहे. या शास्त्रपरंपरे जतन करण्यासाठी संस्कृत विद्यापीठ कटिबद्ध आहे.शास्त्र अध्ययनासह शास्त्र कण्ठस्थीकरण शास्त्रशलाकापरीक्षा, शास्त्रभाषण इ. पारंपारिक स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी या निवडफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या निवडफेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी चांगले प्रदर्शन केले त्यांनाच राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या के. जे. सोमया संस्कृत विद्यापीठाच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय शास्त्र स्पर्धेत घेवून जाण्यात आले.

या निवड फेरीच्या भाषण व इतर स्पर्धांकरिता विश्वविद्यालयातील सर्व शिक्षक परीक्षक स्वरूपात उपस्थित होते. या स्पर्धेला एकूण 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

15) **मतदान जागृती कार्यशाळा**

दिनांक 12–10–2018 रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या छात्र कल्याण विभागाद्वारे दुपारी 12 ते 02 या वेळेत मतदान जागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे मुख्य प्रयोजन म्हणजे मतदाणाविषयी युवकांमध्ये जागृती निर्माण करणे. मतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. मी एकट्याने मतदान नाही केलं तर काय फरक पडतो!!!. पण थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका–एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. ही भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हाच याचा मुख्य उद्देश्य होय.

मतदानाचे महत्व , मतदान कसे करावे, मतदानाकरिता फॉर्म कसा भरावा, या सर्व विषयांची माहिती देण्याकरिता रामटेक नगरपरिषद येथून काही कर्मचारी आले होते. त्यांनी आपल्या सहर्कायांच्या सहायाने या कार्यशाळेत आपले महत्वाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाला संचालक छात्र कल्याण डॉ. जयवंत चौधरी व विद्यापीठ सूरक्षा आधिकारी श्री प्रवीण कळंबे उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या व्यतिरिक्त छात्र कल्याण विभागाद्वारे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठीय "आविष्कार 2018" या स्पर्धेतही सहभाग घेतला. "आविष्कार 2018 चे आयोजन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे झाले. होते .

****

क्रीडा विभाग

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 2018–19 मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे फेब्रुवारी 2019 मध्ये संपन्न झाला. यात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या चमूने सहभाग घेतला एकूण 18 मुले व मुली यांचा समावेश होता यामध्ये कबड्डी व वैयक्तिक खेळ यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्सफूर्त सहभाग नोंदविला. चमूसोबत संघ व्यवस्थापक या नात्याने श्री. प्रवीण कळंबे व प्रा. सुनील खरवडे उपस्थित होते

तसेच सत्र 18–19 मध्ये विश्वविद्यालयाच्या टी–20 क्रिकेट स्पर्धेमध्ये विश्वविद्यालयाच्या 16 शिक्षक शिक्षकेतर कर्मचा–यांनी सहभाग नोंदविला सदर स्पर्धा जानेवारी 2019 मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे घेण्यात आली होती.

****

महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती विद्यार्थिनी आणि कर्मचारी ह्यांना सुविधा प्रदान करणे, सुरक्षित परिसराची व्यवस्था करणे, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये लिंग समभाव, लिंग समानाभूती निर्माण करणे आणि युजीसीच्या उच्च शिक्षणातील मार्गदर्शक तत्वांविषयी जागरुकता निर्माण करणे यासाठी स्थापन करण्यात आला आहे. तसेच प्रत्येक उच्च शिक्षण संस्थामध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे.

- **विद्यार्थिनींचा आत्मसंरक्षण विषयावरील कार्यशाळेत सहभाग**– रामटेक, गुरुकुलम परिसरातील विद्यार्थीनी ऋतुजा पाटील, कस्तुरी मुळे, मेधा डहारे आणि कोमल गोन्नाडे ह्यांनी धोटे बंधू विज्ञान महाविद्यालय, गोंदिया येथे झालेल्या पाच दिवसीय कार्यशाळेत (दि.26 ते 30 नोव्हें.2018) आपला सहभाग नोंदविला. आत्मसंरक्षणविषयक कार्यशाळेत सहभागी होवून प्रायोगिक कौशल्य प्राप्त करण्याची संधी प्राप्त झाली यासाठी आनंद व्यक्त केला.

- **स्त्रीसक्षमीकरणावर व्याख्यान** –विश्वविद्यालयाच्या आऊटरीच कार्यक्रमाद्वारे पंचायत समिती, रामटेक येथे आदिवासी महिलांकरिता 'स्त्री सक्षमीकरण' ह्याा विषयावरील व्याख्यान महिला कक्ष समन्वयक प्रा अनघा आंबेकर यांनी दिले. या व्याख्यानाला जवळपास 65 महिला उपस्थित होत्या.

- **तरुण वयातील मुलींच्या समस्या व समुपदेशन** – दि. 19 डिसेंबर 2018 रोजी एन.आय.टी. संकुल नागपूर येथे समुपदेशन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यात डॉ. जया शिवलकर व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. उज्ज्वला देशमुख ह्यांनी विविध वैयक्तिक तसेच इतर समस्यांचे समाधान केले.

- **'आत्मसुरक्षा व संरक्षण' कार्यशाळा** – दि. 20 डिसेंबर 2018 रोजी 'आत्मसंरक्षण व सुरक्षा' ह्याा विषयावार एन.आय.टी. संकुल नागपूर येथे राष्ट्र सेविका समिती, नागपूर ह्यांच्या सहकार्याने शिबीर आयोजित करण्यात आले. ह्याामध्ये स्वतःवर हल्ला झाल्यास सुरक्षा व संरक्षण ह्याा दृष्टीने प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने मार्गदर्शन करण्यात आले.

- **'आत्मसुरक्षा व संरक्षण' कार्यशाळा** – दिनांक 10 जानेवारी 2019 रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विष्वविद्यालय गुरुकुल परिसर, रामटेक येथे विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कर्मचारी ह्यांच्यासाठी विविध प्रात्यक्षिके, समूह कृती यांच्याद्वारे 'आत्मसुरक्षा व संरक्षण' यावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत सर्वांनी अत्यंत उत्साहाने सहभागी होऊन परिसर जिवंत केला. यासाठी राष्ट्र सेविका समितीने विशेष सहकार्य केले.

- **समुपदेशन कार्यशाळा** – दि. 19 जानेवारी 2019 रोजी वैयक्तिक प्रश्नावली भरून घेऊन त्या आधारे समुपदेशन कार्यशाळेत डॉ. प्राजक्ता कडुस्कर आणि डॉ. जया शिवलकर ह्यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय गुरुकुल परिसर, रामटेक येथे मार्गदर्शन केले.

- **कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक अत्याचार या विषयावरील कार्यशाळेत विश्वविद्यालयाचे प्रतिनिधित्व** –युजीसी मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक आत्याचार प्रतिबंधक कायदा 2013 नुसार नॅशनल लॉ विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथे दि. 5 व 6 ऑक्टोबर 2018 रोजी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ह्याामध्ये महिला कक्ष समन्वयक आणि अंतर्गत तक्रार समिती अध्यक्ष अनघा आंबेकर ह्याांनी विश्वविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. तसेच युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे/कायद्याचे विश्वविद्यालयात पालन केले.

- **विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शकांकडून नियमित समुपदेशन** – विश्वविद्यालयात विद्यार्थिनींसाठी औपचारिक आणि अनौपचारिक प्रणालीद्वारे मार्गदर्शकांद्वारे नियमित समुपदेशन सुविधा उपलब्ध आहे. ह्याद्वारे त्यांच्या मानसिक व भावनिक क्षमता वाढविणे तसेच त्यांच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक समस्या सोडविण्यावर भर दिला जातो.

- **अंतर्गत तक्रार समिती** – अंतर्गत तक्रार समिती ही वेळोवेळी यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुर्नगठित केली जाते. समिती समोर आलेल्या सर्व समस्या विहित कालावधीत सोडविल्या जातात. समितीचे सर्व सदस्य स्त्री अत्याचार वा तत्सम समस्यांबाबत अत्यंत दक्ष व सावध असतात.

****

सन्निधी माजी विद्यार्थी संघटना

विश्वविद्यालयाच्या सन्निधी माजी विद्यार्थी संघटनेद्वारे खालील कार्यक्रम संपन्न झाले.

माजी विद्यार्थी मेळावा – 24.01.2018

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विशवविद्यालयाचा संक्रमणोत्सव दिं २४ जानेवारी २०१८रोजी रामटेक परिसरात आयोजित करण्यात आला .दरवर्षी प्रमाणे यावर्षीही संक्रमणोत्सवाचे औचित्य साधून माजी विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमात आमंत्रित करून सहभागी करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांना आपल्या गत शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाचा पुनश्च आनंद अनुभवता यावा यास्तव प्रत्येकवर्षी माजी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात बोलवून माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात येतो.

माजी विद्यार्थी संघटनेची सभा – 19.06.2018 – माजी विद्यार्थ्यांची सभा मा. कुलगुरु आणि मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षते खाली आयोजित करण्यात आली. रामटेक येथे सुरू झालेल्या गुरुकुलाविषयी माहिती या सभेत देण्यात आली आणि माजी विद्यार्थ्यांकडून यासाठी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. माजी विद्यार्थांनी यास भरघोस प्रतिसाद दिला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांचा सत्कार – 21.06.2018 – कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय याच्या सन्निधी माजी विद्यार्थी संघटनेने जागतिक योग दिनाचे औचित्य साधून योगक्षेत्रात भारतात्च नव्हे तर आंतरराष्टीय स्तरावर नाव गाजविलेल्या माजी विद्यार्थांचा श्री. भरतगुप्ता, सौ. सरोजगुप्ता , आणिकु. धनश्री लेकुरवाळे यांचा सत्कार मा.कुलगुरंच्या हस्ते करण्यात आला.

संस्कृत–सन्देश पत्र स्पर्धा – 28.08.2018 – संस्कृत महोत्सवान्तर्गत सन्निधी माजी विद्यार्थी संघटनेद्वारे शालेय विद्यार्थ्यांसाठी संस्कृत सन्देश स्पर्धा घेण्यात आली . या स्पर्धेत एकूण २८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या संस्कृ त सन्देश पत्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी आणि शाळांचा सत्कार करण्यात आला.

माय मराठी (मराठी गीतांचा कार्यक्रम) – 18.02.2019 – मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सन्निधी माजी विद्यार्थी संघटनेद्वारे माय मराठी या मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माजी विद्यार्थीनी मंजिरी वैद्य व तिच्या समूहाने मराठी गीतप्रकार अतिशय मधुर सुश्राव्य पद्धतीने सादर करून श्रोत्यांना मन्त्रमुग्ध केले.

मा. कुलगुरू स्वागत व सत्कार कार्यक्रम – 18.02.2019

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सन्निधी माजी विद्यार्थी संघटनेद्वारे माय मराठी या मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी संघटनेकडून नवनियुक्त कुलगुरू मा. श्रीनिवास वरखेडी यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. स्मृतिचिह्न, शाल, श्रीफळ देउन माजी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्ष , सचिव आणि कार्यकारिणी सदस्यांनी मा. कुलगुरुंचे हर्षोल्लासात स्वागत केले व सर्व माजी विद्यार्थ्यांनी त्याच्या सोबत संवाद साधला.

****

मराठी भाषा गौरव दिन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे नागपूर व रामटेक येथे बुधवार, दि. 27 फेब्रुवारी 2019 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठया उत्साहाने संपन्न झाला. नागपूर येथे ''माय मराठी'' हया विशेष कार्यक्रमा अंतर्गत कविसंमेलन आणि विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी होते. प्रमुख व्याख्याता म्हणून सुविख्यात संस्कृत विदुषी व कवयित्री डॉ. लीना रस्तोगी आणि विशेष अतिथी या नात्याने पंच भाषा कवयित्री आणि साहित्य विहार संस्थेच्या अध्यक्षा, ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती आशा पांडे या होत्या. व्यासपीठावर विश्वविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षा प्रो. नंदा पुरी आणि संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग प्रमुख प्रो. कविता होले विशेषत्वाने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाला. प्रज्ञा करकरे आणि सायली पेशवे यांनी गायिलेल्या सरस्वती स्तवनानंतर प्रो. नंदा पुरी यांनी मराठी भाषेच्या गौरवार्थ विश्वविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. सन्माननीय अतिथी श्रीमती आशा पांडे आणि प्रमुख व्याख्याता यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

प्रमुख अतिथी डॉ. लीना रस्तोगी यांनी प्रारंभी आळंदीवल्लभ श्रीज्ञानदेव माऊलींना वंदन करून मराठी भाषा गौरव दिनाचे कार्यक्रम करणे म्हणजे मराठीविषयी आदरभाव व्यक्त करून थांबणे नव्हे; ही भाषा आपल्या रोजच्या व्यवहारात येणे, आपण ती बोलणे आणि या भाषेतील अक्षर साहित्याचे वाचन करणे त्याची जपणूक करणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले. वररुची या व्याकरणकाराने प्राकृत व्याकरणावर ग्रंथ लिहिला त्यानेही विविध नियम सांगून प्राचीन अशा महाराष्ट्री भाषेचा दाखला देत अवशिष्ट व्याकरण नियम हे महाराष्ट्री भाषेप्रमाणे आहेत असे स्पष्ट लिहिले आहे. अशी प्राचीन समृद्ध परंपरा आपल्या आपल्या मराठीची असताना आज आपण इंग्रजी भाषेच्या कुबडया घेवून बोलतो, आपली भाषा अस्खलितपणे आपल्याला बोलता येत नाही तर पुढच्या पिढीला ती कशी बोलता येईल? मराठी भाषेत म्हणी आणि वाक्प्रचारांचा मोठा खजिना उपलब्ध आहे, त्याचा समृद्ध आणि विवेकी वापर करणे आवश्यक आहे. तसेच नवनवीन विषय विशेषतः तंत्रज्ञानाच्या संदर्भातील इंग्रजी शब्दांसाठी नवनवीन मराठी शब्दांची निर्मिती करणे आवश्यक असून तसा शब्दकोश तयार करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.''

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी अस्खलित मराठी भाषेतून केलेल्या भाषणाला सर्वांनी टाळयांच्या प्रतिसादात उत्स्फूर्त दाद दिली. आपल्या भाषणात प्रो. वरखेडी म्हणाले, ''मराठी भाषेद्वारेच मराठी संस्कृतीचा परिचय अधिक उत्तम रीतीने होऊ शकतो. आपल्या विचारधारेची मराठी ही वाहिका आहे. मातृभाषेचे हे महत्त्व आणि गौरव लक्षात घेऊनच आम्ही संपूर्ण कालिदास वाङ्मय मराठी भाषेत अनुवादित करण्याचा प्रकल्प राबविला असून आता तो पूर्णत्वास आला आहे. लवकरच तो सर्वांना उपलब्ध होईल. विश्वविद्यालयातर्फे मराठी भाषेच्या गौरवार्थ राबविण्यात आलेला हा

अनुवाद प्रकल्प आम्हा सगळयांसाठी आनंददायी ठरला आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा आणि अनुवाद प्रकल्पामध्ये सहभागी सर्वांचे त्यांनी अभिनंदन केले.''

या विशेष व्याख्यानानंतर मराठी कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. श्रीमती आशा पांडे कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी होत्या. यामध्ये डॉ. अर्चना अलोणी, डॉ. लीना रस्तोगी सौ. स्मिता देशपांडे, प्रो. नंदा पुरी, सौ. स्वाती देशपांडे, सौ. सुषमा मुलमुले, प्रो. कविता होले, डॉ. पराग जोशी, डॉ. जयवंत चौधरी, श्रीमती आशा पांडे यांनी कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे बहारदार संचालन व आभारप्रदर्शन सायली पेशवे हिने केले.

रामटेक येथे ''मराठी कवितेतील मानवतावाद'' या विषयावर विद्यासागर कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. गिरीश सपाटे यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानात मुकुंदराज, ज्ञानेश्वरांपासून आधुनिक कवी बा. सी. मर्ढेकर, मंगेश पाडगावकर यांच्यापर्यंतच्या कवींच्या काव्यांचा आढावा घेतला. त्यांच्या कविता पाठांतराने आणि ओघवत्या वाणीने सभागृह मंत्रमुग्ध झाले. दोन्ही कार्यक्रमांना विद्यार्थी, प्राध्यापक, विभाग प्रमुख तसेच रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती.

****

महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार 2017 व 2018

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार समारोह'' आज शुक्रवार, दि. 29 मार्च 2019 रोजी सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे संपन्न झाला. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या आध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळयाला प्रमुख अतिथी या नात्याने विश्वेश्वरय्या प्रौद्योगिकी राष्ट्रीय संस्थान, नागपूरचे अध्यक्ष, प्रख्यात उद्योजक आणि संस्कृतप्रेमी श्री. विश्रामजी जामदार उपस्थित होते. बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापक श्री. रमेश शर्मा, पुरस्कारप्राप्त विद्वान पं. वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट यांच्यासह संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होते.

सरस्वती स्तवन आणि विश्वविद्यालय गीतानंतर संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्काराची पूर्वपीठिका सांगितली. ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे. समाजात संस्कृत भाषेला गौरवयुक्त स्थान मिळवून देण्यात ज्यांनी अमूल्य योगदान प्रदान केले अशा महान विभूतींना महाकवी कालिदास संस्कृतव्रती पुरस्कार विश्वविद्यालयाकडून दिला जातो, हे स्पष्ट केले. प्रमुख अतिथी श्री. विश्रामजी जामदार आणि बैद्यनाथचे व्यवस्थापक श्री. रमेश शर्मा यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू देवून मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

पं वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट यांना प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रांचे वाचन अनुक्रमे डॉ. पराग जोशी, डॉ. रेणुका बोकारे आणि डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले.

सन 2017 करिता प्रख्यात संस्कृत पंडित व पुण्याहून प्रसिद्ध होणा–या 'शारदा' संस्कृत पाक्षिकाचे संपादक पं. वसंत गाडगीळ आणि प्रख्यात संस्कृत पंडित आणि साहित्यशास्त्र, संगीत, नाट्य, नृत्य इ. कलांचे तज्ज्ञ, प्राचीन काळातील अवधान कलेचे पुनरुज्जीवन करून तिचे प्रायोगिक स्वरूपात दर्शन घडविणा–या ''शतावधानी'' डॉ. आर्. गणेश, 2018 करिता नागपुरातील प्रख्यात संस्कृत विदुषी आणि संस्कृत भाषा प्रचारिणीच्या अध्यक्षा डॉ. लीना रस्तोगी तसेच संस्कृत विद्वान प्रो. वसंतकुमार भट्ट, निवृत्त संस्कृत विभागाध्यक्ष, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद यांना हा पुरस्कार देवेश आर्वीकर आणि अद्वैत आर्वीकर यांनी केलेल्या वैदिक मंत्रोच्चारणांच्या उद्घोषात प्रमुख अतिथी श्री. विश्रामजी जामदार, प्रो. श्रीनिवास वरखेडी तसेच अन्य मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, चंदनहार, पुष्पगुच्छ, रोख धनराशी, भेटवस्तू यांचा पुरस्कारामध्ये समावेश होता.

पुरस्कारप्राप्त विद्वानांचा संक्षिप्त परिचय –

पं. वसंत गाडगीळ हे महाराष्ट्रातील प्रख्यात वेदविद्या पंडित आहेत. महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि आजही उत्तमरीत्या सुरू असलेले संस्कृत भाषेतून प्रकाशित होणा–या ''शारदा'' पाक्षिकाचे ते संपादक आहेत. यावर्षी हे पाक्षिक हीरक महोत्सव साजरा करीत आहे. याशिवाय देश–विदेशात निरंतर व्याख्यानांसाठी त्यांना निमंत्रित केले जाते. संस्कृत पत्रकारितेचा व वेदविद्येचा वसा निष्ठेने चालविणा–या पंडितांमध्ये श्री. गाडगीळ हे अग्रेसर आहेत.

डॉ. आर्. शतावधानी गणेश – प्राचीन संस्कृत अवधानींची परंपरा आधुनिक युगात पुनरुज्जीवित करणारे डॉ. आर् शतावधानी गणेश हे बहुमुखी प्रतिभा असलेले, विविध कलांमध्ये सहज संचार आणि योगदान देणारे तसेच संस्कृतादि विविध विषयांचे प्रख्यात विद्वान् आहेत. मूळचे बेंगलुरूचे असणा–या श्री गणेश यांनी साहित्यशास्त्र, साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, तत्त्वज्ञान, भारतीय सौंदर्यशास्त्र, संस्कृती, वैदिक अध्ययन, विज्ञान, कला, इतिहास इ. अनेक विषयांमध्ये नैपुण्य आणि तज्ज्ञता प्राप्त केली आहे. कन्नड या मातृभाषेसह तेलुगू, संस्कृत, प्राकृत, पाली, तामिळ, इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती, मलयालम्, ग्रीक, लॅटिन आणि इटालियन इ. भाषांमध्ये ख्यातिप्राप्त आहेत. यांत्रिकी अभियांत्रिकी, धातुशास्त्र, संस्कृत या विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले डॉ. गणेश हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. इंग्रजी, संस्कृत, कन्नड यामध्ये अभ्यासपूर्ण असे 34 ग्रंथ आणि संशोधन पर असे 23 ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. ''शतावधानी'' डॉ. आर्. गणेश यांचा ''अष्टावधान'' कार्यक्रम दि. 18 ऑगस्ट 2019 रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे सन्माननीय कुलगुरू प्रो. रजनीश शुक्ल यांच्या शुभहस्ते व कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. आर् गणेश यांना महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

प्रो. वसंतकुमार भट्ट हे साहित्य व्याकरण आणि हस्तलिखिशास्त्राचे विद्वान आचार्य आहेत. गुजरात विद्यापीठात भाषाविभागाचे संचालकपद तसेच संस्कृत विभागाध्यक्ष पद त्यांनी भूषविले आहे. अभिज्ञानशाकुन्तल या कालिदासविरचित नाटकाची पाठचिकित्सा आवृत्तीचे महद्कार्य भट्ट यांनी केले आहे. राष्ट्रपती सन्मानासह अनेक मानसन्मान त्यांना प्राप्त झाले असून त्यांची 42 पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

डॉ. लीना रस्तोगी या उमरेड येथील नूतन आदर्श कला महाविद्यालयातून संस्कृत विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाल्या आहेत. सांप्रत त्या संस्कृत भाषा प्रचारिणी सभेच्या अध्यक्षा आहेत. संस्कृत भवितव्यम् या नागपुरातून प्रकाशित होणा–या साप्ताहिकाच्या पूर्वसंपादिका आहेत. संस्कृत विदुषी आणि संस्कृत कवयित्री म्हणून त्या महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभरात प्रख्यात आहेत. महाराष्ट्र शासनाचा महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्काराने त्यांचा यापूर्वी गौरव झाला आहे. त्यांचे 17 ग्रंथ प्रकाशित झाले असून 10 प्रकाशनाधीन आहेत. तसेच अनेक संस्कत एकांकिकांची रचना त्यांनी केली आहे.

प्रमुख अतिथी श्री विश्रामजी जामदार यांनी आपल्या भाषणात संस्कृतचे महत्त्व प्रतिपादन केले. ''संगणकासाठी संस्कृत अचूक भाषा आहे हे सर्वविदित आहे; परंतु संगणकतज्ज्ञाला संस्कृत भाषेचे ज्ञान नसते तर संस्कृत तज्ज्ञाला संगणकाचे ज्ञान नसते ही तफावत दूर करण्याचा प्रयत्न व्हीएनआयटी ने संस्कृत विषयक अभ्यासक्रम परिचालित करून

केला आहे. संगणक, अभियांत्रिकी या शाखा आणि संस्कृत यांचे आंतरविद्याशाखीय अध्ययन झाले पाहिजे. विशेषतः अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये संस्कृत हा विषय सुरू झाला पाहिजे असे स्पष्ट मत व्यक्त करून संस्कृत शिकलेली व्यक्ती ही संस्कारी आणि संस्कृतीचे पालन करणारी असते असे आपले निरीक्षण आहे. संस्कृत क्षेत्रातील या थोर विद्वानांचा सत्कार करण्याचे सौभाग्य मला विश्वविद्यालयाने दिले यासाठी मी सन्माननीय कुलगुरूंचा आभारी आहे. संस्कृत क्षेत्रातील या समर्पित व्यक्तिमत्त्वांच्या सहवासाने मी पुनीत झालो असे भावपूर्ण उद्‌गारही श्री जामदार यांनी व्यक्त केले.'' बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापक श्री. रमेश शर्मा यांनी आयुर्वेद आणि संस्कृत यांचा संबंध अधोरेखांकित करून आपले संपूर्ण सहकार्य विश्वविद्यालयाला राहिल असे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी पं. गाडगीळ, डॉ. रस्तोगी आणि प्रो. भट्ट हे संस्कृत भाषेसाठी आपले जीवन समर्पित केलेली व्यक्तिमत्त्वे आहेत, त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी ठेवला पाहिजे. अशा तपःपूत विद्वानांचा सत्कार करणे विश्वविद्यालयाला भूषणावह आहे. या पुरस्कार कार्यक्रमासाठी सहकार्य करणा–या सर्वांचे आभारही मा. कुलगुरू महोदयांनी मानले.

पुरस्कार समारोहाचे संचालन डॉ. रेणुका बोकारे यांनी आणि डॉ. रेणुका करंदीकर यांनी संचालन केले तर आभार कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी यांनी मानले. एकात्मता मंत्राने कार्यक्रमाची समाप्ती झाली. या समारोहाला नागपुरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्कृत विद्वान, संस्कृतानुरागी, विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, विविध महाविद्यालयांचे संस्कृत विभागप्रमुख, गणमान्य नागरिक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराच्या समन्वयक या नात्याने जनसंपर्क अधिकारी डॉ. रेणुका बोकारे यांनी यशस्वीरित्या कार्य केले. या कार्यक्रमासाठी प्रो. कविता होले, डॉ. पराग जोशी, सौ. माधुरी येवले, श्री. मंगेश आटे, श्री. उमेश पाटील यांचे सहकार्य लाभले.

****

वार्षिक अहवाल
मराठी

प्रकरण तिसरे
प्रशासकीय अहवाल

सामान्य प्रशासन विभाग

- विश्वविद्यालय अधिनियम कायदा कलम 25/2 अन्वये, 2019–2020 या शैक्षणिक सत्रामध्ये मा. व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या एकूण 6 सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.
- विश्वविद्यालयाच्या वेबसाईट पोर्टलवर सर्व सूचना, परिपत्रके, कार्यालयीन आदेश वगैरे अपलोड करण्यात येतात. तसेच सर्व आदेश ऑनलाईन निर्गमित करण्यात येतात. यामुळे कागदाचा वापर कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.
- विभागामार्फत विश्वविद्यालयाचा वर्धापन दिवस आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामधे प्रथमच उत्कृष्ट विभाग/उत्कृष्ट कर्मचारी/उत्कृष्ट संलग्नित महाविद्यालये/इत्यादी पुरस्कार प्रदान करण्यात आले.
- विश्वविद्यालय अधिनियम कायदा कलम 59 अन्वये आवश्यकतेनुसार विविध समित्या आणि कक्ष याचे गठन व पुनर्गठन संबंधी प्रक्रिया वेळोवेळी करण्यात आल्या आहेत. जसे, महिला सेल, महिला तक्रार निवारण समिती, वार्षिक अहवाल समिती, मागासवर्गीय कक्ष, दिव्यांग समिती, इत्यादी....
- दरवर्षीप्रमाणे विविध प्रशासकीय समारंभ, प्रशिक्षण वर्ग, विभिन्न व्याख्यानमाला, इत्यादींचे आयोजन संबंधीची कार्यवाही करण्यात आली. जसे वर्धापनदिन, कालिदास दिन, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, कामगार दिवस वगैरे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.
- कार्यालयीन/परिसराच्या सुनियोजनाच्या दृष्टीने निर्देशानुसार तसेच शासनाकडून प्राप्त आदेशान्वये, वेळोवळी परिपत्रके, अधिसूचना, सूचना, कार्यालयीन आदेश, कार्यक्रमांचे अहवाल निर्गमित करण्यात आले आहे.
- विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकरिता तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी तसेच येणाऱ्या अभ्यागतांकरिता तथा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता तात्पुरत्या स्वरूपात नागपूर–रामटेक येण्या–जाण्यासाठी बस सुविधा सुरू करण्यात आली असून विभागाकडून याचे सुचारू व्यवस्थापन करण्यात येते.
- विद्यापीठातील आवक आणि जावकचे कार्य तसेच रामटेक परिसर व वारंगा परिसर येथील अंतर्गत आवक व जावकचे कार्य विभागाकडून करण्यात येते.

****

आस्थापना विभाग

महाराष्ट्र शासनाद्वारे अधिनियम क्र. 33–1997 अन्वये प्रस्तुत विश्वविद्यालयाची स्थापना दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी झाली. शासनाने प्रस्तुत विश्वविद्यालयातील पाच शैक्षणिक विभागांकरिता एकूण 35 शिक्षकीय पदे आकृतीबंधानुसार मंजूर केली आहेत. त्याचप्रमाणे 114 शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

शासनमान्य शिक्षकेतर पदे

एकूण मंजूर पदे					एकूण भरलेली पदे					एकूण रिक्त पदे				
अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण
22	10	50	32	**114**	14	07	36	26	**83**	08	03	14	06	**31**

शासनमान्य शिक्षकीय पदे

एकूण मंजूर पदे	एकूण भरलेली पदे	एकूण रिक्त पदे
35	**19**	**16**

सेवाज्येष्ठता यादी

कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी प्रतिवर्षी प्रसिध्द करावी असे शासनाचे धोरण असून त्यानुसार विश्वविद्यालयाने 2018 ची अद्ययावत सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

कर्मचारी हिताचे निर्णय

1) रजा मान्यतेच्या आदेशाची प्रत ई–मेल मार्फत कर्मचा–यांना देण्यात येते.

